## प्रकरण तिसरे

### यशवंतांची सामाजिक, ऐतिहासिक, कौटुंबिक आणि प्रेम कविता - स्वरूप व विशेष

यशवंतांची कविता विपुलतेबरोबरच विविध स्वरूपाची आहे. सामाजिक, कौटुंबिक, प्रेम, जानपद, ऐतिहासिक, चिंतनपर, आशा, निराशावादी अशी यशवंताची कविता आहे. त्यांची कवितेमागची भूमिका भक्कम आणि स्थिर आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेत फारसे बदल झाले नाहीत आणि म्हणूनच त्यांच्या नंतरच्या काळातील कवितांबद्दल ''कवी लिहित नसून लेखणी मात्र लिहीत आहे'' असे उद्‌गार रा. श्री. जोगांनी काढले आहेत. जगातील घडामोडींचा त्यांच्या मनावर होणारा परिणाम ठराविक पद्धतीनेच होत राहिला. त्यामुळे असे म्हणावे लागले असे रा. श्री. जोग म्हणतात. केशवसुतांची कविता आणि केशवसुती संप्रदायाची कविता यांच्याशी यशवंतांच्या कवितेचं एकरूपत्त्व झालं नाही. केशवसुतांच्या कवितेत आढळणारी रुढीग्रस्त समाजाविरूद्धची लढाई यांच्याही कवितेत आहे. पण केशवसुतांना जुने जाळून तिथे नवे उभारण्याचा ध्यास होता, तो येथे नाही. रविकिरण मंडळातील कवींची समाजाविरूद्धची लढाई ही व्यक्तीविरूद्ध समाज या प्रकारची होती. वैयक्तिक सुखदुःखांची मातबरी यांना अधिक होती. म्हणूनच वैयक्तिक सुखांच्या आड समाज येतो म्हणूनच समाजातील जाचक रूढी परंपरांचा आगरकरप्रणित बुद्धिवादाच्या भूमिकेतून या कवींनी निषेध केला. नवशिक्षित सुधारणोत्सुक असा तरुणवर्ग आणि परंपराप्रिय वडीलधारी मंडळी यांच्यातील हा कलह होता. हा नवशिक्षित तरुणवर्ग सुधारणाप्रिय होता. पण या सुधारणा प्रत्यक्ष जीवनात आणायला जुनी पिढी तक्रार देत होती. ही घुसमट त्यांनी आपल्या कवितांतून व्यक्त केली.

कविता ही कवीच्या स्वानुभूतीचाच भाग असते. पण यशवंतांच्या सामाजिक कवितेत वर उल्लेखलेली व्यक्तीगतता फारशी जाणवत नाही. त्यांची दृष्टी निरीक्षकाची आहे असे जाणवते. म्हणूनच समाजातील अनिष्ट रूढी पाहून यशवंत व्यथीत होतात, चिडतातही आणि औपरोधिक भाषेने त्यावर शेरे ओढतात. ''केशवसुतांच्या ओजस्वी कवनांत सामाजिक क्रांतीचे आवाहन आहे. कुसुमाग्रजांच्या तेजस्वी कवितांत राजकीय क्रांतीची स्तोत्रे आहेत. यशवंतांच्या रसरशीत कवनांना ही दोन्ही अधिष्ठाने स्पष्टपणे लाभलेली नाहीत. पण त्यांची अशा प्रकारची कविता उत्कट स्फुरणातून लिहीली गेली आहे. मानवी जीवन ही लढाई आहे या भावनेने ती प्रेरित झाली आहे. तिच्यातून झळकणाऱ्या ओजस्वी व उदात्त छटा विलक्षण परिणामकारक आहेत.'' (१)

त्यांच्या प्रेमकवितेतही ही परिणामकारकता आहे. कारण त्यांची प्रेमकविता केवळ कल्पना-विलासात रमणारी आणि शृंगाराच्या गंधर्व नगरीत भराऱ्या मारणारी नाही. प्रेमकाव्यामागील भूमिकाही व्यवहाराच्या खडबडीत जमिनीवरून चालत जाणाऱ्या एका रसिक प्रापंचिकाची आहे. म्हणूनच स्त्रीसौंदर्याचे आकर्षण त्यांच्या कवितेत नाही. कवितेतील शृंगारचित्रणही सौम्य व संयत असते. शारीरीसौंदर्यपेक्षा मनाचेभावसौंदर्यच त्यांना अधिक भावलेले दिसते. बगीच्यापेक्षा ती जमीन बरवी बावनकशी.. (तूच रमणी - पाणपोई) हीच भूमिका यापाठीमागे आहे. बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात खाण्यापेक्षा शेताच्या मातीत हात भरविलेले काय वाईट? हीच त्यांची श्रद्धा दिसते. पण ही भूमिका आग्रहाची अथवा अविर्भावाची वाटत नाही. त्यांच्या नितळ मनाचाच तो आविष्कार आहे असे वाटते. सुरूवातीच्या कालखंडातील प्रेमकवितेत कवी कल्पनारम्यतेत रमलेला दिसतो. 'यशोगंध'

काव्यसंग्रहातील कविता याची साक्ष देतात. पण कवी कल्पनारम्यतेत रमलेला दिसला तरी त्याने आपले संयतपण सोडले नाही. प्रेमासाठी ज्योतीवर जळून जाणाऱ्या पतंगाचा आवेश त्यांच्या कवितेत नाही. पण अढळ अशी प्रेमनिष्ठा व्यक्त होते.

जानपद गीतांचा प्रकारही मराठी काव्यात रुढ करण्याचे श्रेय काही अंशी रविकिरण मंडळाला द्यावे लागेल पण बऱ्याच अंशी यशवंतांना द्यावे लागेल. १९२० ला भारताच्या राजकारणात गांधींचा उदय झाला. त्यांच्या विचारप्रणालीने सारा समाज भारावून गेला. ''सत्य, अहिंसेबरोबरच खेड्याकडे चला'' हाही संदेश त्यांनी दिला. याचाही थोडासा परिणाम म्हणून तत्कालीन कवींनी ग्रामीण जीवनावर कविता लिहीली. खेड्यातला सुशिक्षित तरुण नोकरीच्या निमित्ताने शहरात आला. स्वतःचे खेड्यात घालवलेले रमणीय जीवन त्यांना ओढ लावीत होते. साहजिकच त्यांनी तशा प्रकारच्या कविता लिहील्या. ग्रामीण प्रेमगीत हे एक यशवंतांचे प्रशंसनीय वैशिष्ट्य आहे. यशवंत खेड्यातील वातावरणाशी एकरूप झाले असल्याने त्यांची ही जानपद कविता उत्कृष्ठ वठलीआहे. खेड्यातील शेतकरी जीवनातून रांगडा शृंगार मोकळ्या अंगांने कसा वावरतो हे त्यांनी कौशल्याने दाखविले आहे. त्यातील 'न्याहारीचे गाणे' रजतपटावरही चित्रित झाले आहे. पण त्यांची ग्रामीण कविता सगळीच प्रेमविषयक नाही. ग्रामसंस्कृतीतल्या श्रमाचे अधिष्ठानही त्यांच्या कवितेत आहे. पण तत्कालिन कवींनी नाविन्याची आणि अद्भुतरम्यतेची ओढ म्हणून ग्रामीण कविता लिहीली. पण यशवंतांच्या 'जानपद'कवितेत एक निष्ठा दिसते. त्यांची अशा प्रकारची कविता अल्पशी असली तरी तिला खूप लोकप्रियता मिळाली होती.

एकाहून एक सरस अशी कौटुंबिक कवने त्यांच्याइतकी कुणी लिहिली नाही. वत्सलभावाचे मनोज्ञ दर्शन या कवितांतून घडते. त्यांच्या कुटुंबवत्सल मनाचाच हा सहजाविष्कार असावा.

यशवंताची कविता निराशावादीपणाचेच सूर आळवते असे म्हटले जाते. ते खरे आहे. पूर्वायुष्यातील भोगलेल्या कष्टांचा परिणाम आणि नंतर आंतरजातीय विवाह केल्याने पदोपदी झालेली अवहेलना यामुळे आलेली निराशा.. त्या निराशेचे उद्रेक अनेक कवितांमधून बाहेर पडले आहेत. ते अंतरीचे तळमळीचे बोल असल्याकारणामुळे त्यातून जिवंत काव्याचे लोट वाहताना दिसतात. निराशा जरी सारखी मनाला ग्रासत असली तरी ती लोकांच्या संकुचित वृत्तीमुळे. म्हणूनच विशालतेकडे जाण्याची ओढ त्याला आहे. म्हणूनच तो म्हणतो 'कोठवर भरशील आपुल्या विहीरीवर घडे, हा अफाट सागर पुढे''. सुखदुःखाच्या कसल्याही अवस्थेत चित्तात समाधान असू द्यावे हा संतांना साजेसा उपदेशही कवी करताना दिसतो. (सरीता करीते का कधी खन्त) संकुचिततेकडून विशालतेकडे जाण्याचा संदेश ते त्या कवितातून व्यक्त करतात. जगाकडून कितीही अवहेलना झाली तरी आशेचा एखादा किरण तरी हाती येतो म्हणून ''नसे जग सर्वस्वी अनुदार' असा आशावाद प्रकट करतात.

निसर्गवर्णनपर अशी कविता त्यांनी लिहीलेली दिसत नाही. अपवादात्मक एखादीच (जलक्रिडा - यशोधन) प्रतिमायोजनेसाठीच क्वचित निसर्गातील दाखले येतात. इतिहासातील रोमहर्षक घटनांचे यशवंतांना आकर्षण आहे. त्यातूनच त्यांची ऐतिहासिक कविता जन्माला आली आहे. देशात स्वातंत्र्याचे वारे वहात असताना पूर्वजांच्या पराक्रमाची आठवण युवकांना करून दिली म्हणजे त्यांचे बाहू स्फुरण पावतील. या हेतूने त्या काळात ऐतिहासिक कविता निर्माण झाली. यशवंतांचे इतिहासाबद्दलचे प्रेम

इतके अफाट होते की केवळ स्फुट कविता लिहूनच ते थांबले नाहीत तर स्वतंत्र खंड आणि महाकाव्यनिर्मिती त्यावर केली. 'छत्रपती शिवराय' आणि 'रणदुर्गा झाशीवाली' ही काव्ये याचीच द्योतक आहेत.

विपुलता, विविधता, सरसता इत्यादी गुण त्यांच्या कवितेत आहेत. सामान्य माणसाच्या रोजच्या साध्या जीवनातल्या अनुभवांना वाचा देण्याचे काम त्यांनी आपल्या कवितेतून केले आहे. पण ते वास्तवतापूर्ण आहे. यशवंतांनी विविध प्रकारची कविता लिहीली असली तरी त्यांची दृष्टी वास्तवातच अधिक रमते. त्यांची एक ठराविक आणि अढळ निष्ठा आहे. तिच्यापासून ते पदच्युत झालेले दिसत नाहीत.

**सामाजिक कविता -**

.... ''तुतारी, नवा शिपाई, स्फुर्ती यांसारखी कवने लिहीणे रविकिरण मंडळातील कोणाही सदस्याला जमले नाही. समाजाविरूद्ध जेथे म्हणून या कवींनी तक्रार केली आहे तेथे ती वैयक्तिक आकांक्षांचा कोंडमारा झाल्यामुळेच केली आहे. हे स्पष्ट आहे. या ठिकाणी भीषण रूढींच्या जुलमामुळे पिचणारा हतभागी मानव दिसत नसून आपल्या वैयक्तिक इच्छांचा व आकांक्षांचा समाजामुळे चुराडा होतो - विचारस्वातंत्र्य व आचारस्वातंत्र्य नसल्यामुळे आपल्या व्यक्तिविकासाच्या मार्गात अडथळे येतात इत्यादी विचारांच्या आहारी गेलेल्या आत्यंतिक व्यक्तिवादी, स्वयंकेंद्रित, सर्वप्रकारच्या स्वातंत्र्यवादाचा किंबहुना स्वैरपणाचा पुरस्कार करणारा, भावनावश स्वच्छंदी माणूसच दिसून येतो.'' (२)

वैयक्तिक आकांक्षांच्या व आशांच्या आड समाज येतो असे मानून त्याच्या दमनशक्तीचा निषेध करणे व व्यक्तीच्या महत्त्वाचा पुरस्कार करणे ही गोष्ट रविकिरण मंडळातील कवींनी केली आहे. असा वरील अवतरणाचा मतितार्थ, यशवंतांच्या कवितेच्या बाबतीत हा अभिप्राय कितपत लागू होतो हे त्यांच्या सामाजिक कवितांचा आढावा घेऊन पहावयाचे आहे आणि त्यांच्या सामाजिक कवितेची वेगळी वैशिष्ट्ये आणि सामर्थ्ये यांचाही पडताळा घ्यावयाचा आहे.

कवी हाही समाजाचाच घटक असतो. समाजाची सुखदुःखे त्याचीही असतात. समाजाचा घटक असण्याबरोबर तो एक निरीक्षक आणि भाष्यकार असतो. आपली सामाजिक जाणीव तो कवितेतून व्यक्त करतो. यशवंतांच्या काकची सामाजिक पार्श्वभूमी पहिल्या प्रकरणात पाहिली आहे. राजकारणात टिळकांचा अस्त व गांधीजींचा उदय, स्वातंत्र्यलढा, शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार, पहिले महायुद्ध, रशीयन राज्यक्रांतीमुळे साम्यवादाचे वारे इत्यादी घटना भोवताली घडत होत्या. समाजजीवनात त्यामुळे बदल होत होते. सामाजिक कवितेच्या बाबतीत यशवंत तत्कालिन संकेत-प्रवाह यांना बळी पडलेले नाहीत. त्यांची कविता स्वतंत्र आहे. किंबहुना अधिक सामर्थ्यशाली आहे. सामाजिक जाणीवांचा अचूक वेध घेणारी आहे.

सुरूवातीच्या काळातली त्यांची कविता ही प्रामुख्याने प्रतिकात्मक आणि जगरहाटीचे दर्शन घडविणारी अशी आहे. 'गुलामाचे गाऱ्हाणे'(१९२३) या कवितेत बैलाच्या प्रतिकातून सर्वच श्रमजीवी लोकांची कैफियत मांडली आहे. ओझे घेणाऱ्याचा विचार ओझे टाकणारा करीत नाही. येथे बैलाच्या मनोगतातून वस्तुस्थितीचे फक्त वर्णन करून इष्ट तो परिणाम साधण्याचा प्रयत्न केला

आहे. कष्टकऱ्यांनी मरेपर्यंत राबराब राबावे आणि त्यांच्या जीवावर ऐतखाऊंनी आरामात खावे हा कोठचा न्याय? पण म्हणून त्या ऐतखाऊला शासन करावे असे त्याला वाटत नाही.

''त्या बक्षिसाच्या पोतड्या हासून मोतद्दार घे

माझ्या तनूच्या चिंधड्या कोणीही पाहे ना परि''

किमान माझ्या कष्टांची दखल घेतली जावी. तशी दखल घेतली जात नाही. मग मी मरून जावे अशी तर मालकाची इच्छा नाही ना? ओझे झुगारून देण्याचा उद्दाम आवेश त्याच्यात दाखविलेला नाही.

(कुसुमाग्रजांच्या 'आगगाडी व जमीन' मध्ये आहे तसे) गुलामाचे दुःख वस्तुनिष्ठ रितीने व्यक्त केले आहे. पण हे दुःख म्हणजे परिस्थितीतच खितपत पडणे आहे. 'लिलाव'मध्ये गरीबाच्या संसारावर जप्ती येऊन त्याचा लिलाव चालला आहे. पण हे चित्रण म्हणावे तितके परिणामकारक झाले नाही. 'करदा' हे माळाचे - जमिनीचे मनोगत आहे. माणसाने माझे शोषण चालविले आहे. माझ्या मनाचा अजिबात विचार केला जात नाही. पडीक जमीन पिकाखाली आणताना माझ्या शरीराच्या चिंधड्या उडविल्या जातात आणि हे सारे ''तव उन्नतिस्तव'' अशी सारवासारव केली जाते. ढगांनी पाठ फिरवली तर माझ्याच पोटातले पाणी काढून हे पिके घेतात.

''रत्नाढ्या' नि 'सुवर्णभू' स्तुतिपदी गाता मुखी

घेई स्वत्व मदीय मात्र पुरते शोषून हा मानव'' (करदा -पागपोई) कामगाराचे मालकवर्गाकडून होणारे शोषण ह्याच प्रकारचे असते. माळ हे तळागाळातल्या दरिद्री लोकांचेच प्रतिक वाटतो. हा तळागाळातील समाजही जमीनीसारखाच काहीही हालचाल न करता निपचिप पडून राहिलेला असतो. पण दुर्बल शोषीतांच्या कष्टावर जगणाऱ्या ऐतखाऊंनो, 'आपली पोळी कशी राखावी' याची काळजी तुम्हालाच सतत करावी लागणार. उद्याच्या अन्नाची सोय करण्यासाठी तुम्हीच अधिक जुलूम करणार.

''जयांना बापजाद्यांच्या मिळे पुण्याईने मत्ता

जयांना लायकीपेक्षा वशीला देतसे सत्ता

वहावी भीति राखाया तयांनी आपुली पोळी''.

कारण कष्टकरी स्वतःच्या कष्टावर जगतात. उद्याची फिकीर त्यांना नाही. जोवर मनगटात बळ आहे तोवर कशाचीच काळजी करण्याचे कारण नाही.

''कमाईनेच कष्टांच्या शिजे ज्याचा स्वयंपाक

उद्याच्या सोय अन्नाची न घाली त्याजला धाक.''

(भुकेची भिती कोणाला - ओजस्विनी)

उच्चवर्गाला यात आव्हान दिले आहे तर 'धरा हो अन्त्यजा हाती' (यशोगंध) असा उपदेशही केला आहे. 'अन्त्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न केशवसुत लिहीतात तर 'धरा हो अन्त्यजा हाती'' असा सरळसरळ उपदेश यशवंत करतात.

निराशा करणाऱ्या सामाजिक स्थितीचे चित्रण 'ही काम अवकळा' या कवितेतून केले आहे. पूर्वी ज्यांनी पराक्रम केले त्यांची मुलेबाळे आज फुसक्या बढाया मारत आहेत. कोयता-विळा गनिमाची खाण्डोळी करायला आणि आपला देश धर्म सांभाळायला विसरला आहे. बाहेर कुणी ऐकत नाही. कारण तेवढी ताकद अंगात नाही. म्हणून आजचा तरुण आपल्या घरातल्या म्हातारीला चळाचळा कापायला लावतो आणि त्यात धन्यता मानतो. जे सत्त्वशील होते त्यांचे वंशज आज लुबाडणूक करीत आहेत. देव - धर्म करणाऱ्यांच्या अन्तर्यामी फक्त स्वार्थच आहे. कार्यमूढ पोटभरूपणा आहे. क्षुद्रांचा कलकलाट आणि मूढांचा बुजबुजाट झाला आहे.

दुसऱ्या महायुद्धातील हिंसा, विध्वंस, मानवतेला विसरलेला माणूस हे पाहून कवी उद्विग्न होतो. विध्वंसाचे, असंतोषाचे आणि वैराचे विष ओकणाऱ्या शक्तींना उपरोधाने कवी म्हणतो

''आपण विजयी वीर गडी

ऐशी बसवू नवी घडी''

सुंदर कुरणांवर वसाहती बसवा. ओढे आणि नद्या यात गटारे सोडा. शुद्ध वारा दुषित करण्यासाठी उंच धुराडी उभारा. उरली सुरली पृथ्वी पोखरून तेलाच्या खाणी, कोळसा शोधून काढा. शारदाभक्तांना पुरस्कार देऊन मतलबी आणि स्तुतिपाठक बनवा. गरीबांच्या मनात श्रीमंतांबद्दल द्वेश पेरा. दंगलीच्या वेळी सलोखा स्थापन करायला यंत्रसज्ज पलटणी तयार ठेवा. अणुबॉम्ब तयार करण्यासाठी शास्त्रज्ञांना वेठीला धरा. प्रयोगशाळा बांधा आणि -

''स्वतःच आपण होऊ स्फोटक यन्त्रे भीषण वावरती

शस्त्र न यन्त्रा ठिकऱ्या झाल्या जरि सृष्टीच्या मग पुढती'

(नवी घडी - ओजस्विनी)

ही विध्वंसक वृत्ती वाढायला लागल्यामुळे अनर्थामागून अनर्थ होत रहातात. म्हणूनच या भयावह वास्तवापासून अलिप्त, शांत आणि या सर्वांचा साक्षी असणाऱ्या चंद्राला कवी म्हणतो - तू वरून आकाशातून खाली काय बघतोस ?

'आमुच्या पहा रे पूर्व नि पश्चिम भागी

कोसळती शहरे आणि भडकती आगी

तडफडती सडती प्रेते जागोजागी

जणु धरा रौखा व्याली?'' (चंद्रम्या - पाणपोई)

तू करून सुधेची वृष्टी उदंड करतोस पण इथे विषारी रसायने, लोखंडाच्यरा उकळत्या कढ्या थंड पडत नाहीत. तुझा प्रकाश शीतलता देणारा खरा. पण या युध्दाच्या तडाख्याने वणवण फिरणाऱ्या अश्राप कुटुंबाची काहीली तू शमवू शकत नाहीस.

सध्या जगाची घडी घालू पहाणाऱ्या मुत्सद्यांना व महात्म्यांना, सेनापतींना व राज्यकर्त्यांना, द्रष्ट्यांना व प्रेषितांना आपल्या कार्यात बहुधा अपयशच आलेले आढळते. युद्धाने कोणतेही प्रश्न सहसा सुटत नाहीत. तेव्हा राष्ट्रनेत्यांना वाटणारी निराशा "युगंधराचे पालुपद" या कवितेत रंगविली आहे ती अशी -

"घडी वसाया हवी जगाची
नवीन सुंदर शांत निरामय
उरस्फोड का थोडी केली ?
सिन्धु आटले किती शाईचे ?
बोरू मेरू मन्दारांचे
झिजले, गेले तासुन चिंबून
फेसही आला ओठांभवती
- पण
जमेच ना, घडेच ना
बनेच ना, पटेच ना"

मग यावर बंदुक हाच एकमेव उपाय उरला. चुकांमागून चुका होत राहिल्या. त्याचे निवारणही कोणाला करता आले नाही. त्या चुकांच्या उगमापाशी जायला पाहिजे. पण ते होत नाही. तेवढा समंजसपणाही त्यांच्यापाशी नाही. ते हतबद्ध झाले आहेत. त्यामुळेच -

- नव्या जगाची घडी मनोहर
बसेच ना, जमेच ना
घडेच ना, पटेच ना."

(युगंधराचे पालुपद - पाणपोई)

याला कारण औद्योगिक क्रांती आणि नवनवीन शोध हे तर नाहीत. म्हणूनच कवीला

''उभे केले खाम्ब आन्थरिल्या तारा
भूगोलाभोवती प्रचण्ड ही कारा.''

(माया - ओजस्विनी)

असे वाटू लागते.

यांत्रिक प्रगतीने माणसाचे आयुष्य घड्याळाच्या काट्यांशी बांधले गेले. सुखसोयी आल्या. पण बंधनेही आली. धोकेही आले.

'विमानातुन पुष्पवृष्टी झाली' असे उल्लेख पुराणात असतात. जमिनीवर मुळात विहाराला बंधने येतात. पण आकाशात कसली बंधने? कसले धोके? पक्ष्यांना जमीनीवर पारध्यांची जाळी आहेत. आकाशात उडावे तर विमानातून अन्यस्त्रे फेकली जाताहेत. पण हेच विमानात अस्त्रे फेकणारे उद्या त्यांचा पराभव झाल्यावर सुष्ट शक्तींचा विजय झाल्यावर अन्तरातून कपटी असूनही पुष्पवृष्टी करतील.

यशवंतांचे मोठेपण त्यांची सामाजिक कविता अभ्यासताना दिसते. औपरोधिक शैली ही इष्ट परिणाम साधावयास उपयुक्त असते. ''दिवंगताचे स्मारक'' ही समाजातील दुष्टप्रवृत्तीचे चित्रण करणारी प्रभावी कविता. मानवी मनातील बारीकसारीक धागेही यशवंतांनी मोठ्या कुशलतेने उघडून दाखविले आहेत. त्याचे गद्यात वर्णन करणे अशक्यच. तेव्हा त्यांच्याच काव्यपंक्ती पाहणे इष्ट. दिवंगताच्या पुण्यस्मरणासाठी सभा घेतली जाते. श्रोतृजतांचीही चिकार दाटी होते. कारण मेल्यावरच माणसाची महती कळून येते.

''वक्त्यांनीही व्यासपीठावर तशीच केली गर्दी
दिवंगताच्या स्तुतिपाठी ते दिसून आले दर्दी''

''कुणी मृताचे कष्टाळूपण वानियले भरपूर
(गाजविले तये असावे वरिष्ठपण मग्रुर)''

''तोंड भरूनहि कुणी वामिले त्याच्या औदार्याते
(न कळे त्याने दिवंगता किती कसे बुडीले होते)

कुणी म्हणाला ''होता तो हो लढवय्या झुंजार''
(अकुतोभय रिपु आता स्मृतीस हि घेतील का माघारी)

आणखी असे बरेच त्यामुळे

''व्यासपीठाची रंगभूमि हो, आणि नाट्य ये रंगा''

जन्मभर निंदा, नालस्ती, अडवणूक करायची आणि निधनानंतर मात्र श्रेष्ठ, उद्धारक वगैरे विशेषणे लावायची. नगरीचे, परिसराचे केवळ भूषण नसून मायभूमीचे भूषण मानायचे. दिव्य कार्याचे भव्य स्मारक बांधायचा ठराव मांडायचा. बरे-वाईट, सत्यासत्य याचा विचार न करणारी आमची मूढ जनता, तिच्या आधारेच स्मारकनिधी भराभर वाढू लागतो. कारण ''सभापतीचा तसाच होता समाजामधी बोज '' पण या कृत्याचे वर्णन दिवंगताची महती आणि समाजाची कर्तव्यपरायणता असेच होते. हे सगळे घडत असताना दिवंगताच्या उघड्या पडलेल्या बायकामुलांकडे कुणाचेच लक्ष नसते. कुटुंबाचा आधार गेल्याने त्यांना विपन्नावस्था आलेली असते. पण त्यांच्याकडूनही स्मारकनिधी वसूल केला जातो. नवऱ्याच्याच स्मारकनिधी अहवालाचे काम ती मुद्रणालयातून आणून करीत बसते. दिवंगताच्या केवळ नावावर लुच्चे, लफंगे लोक हजारोंनी पैसा गोळा करतात आणि त्यांच्या कुटुंबियांना मात्र हालअपेष्टाच येतात. स्मारकनिधीतून स्मारकमंदिर तयार होते. ज्या रितीने दिवंगताने समाजकार्यासाठी आपले आयुष्य घालविले त्याच रितीने आम्ही समाजकार्य करू असे आश्वासन वक्ते देतात. पण खरेतर यांनीच दिवंगताची तो कार्यरत असताना मानखंडना, शिव्या, वैर, पिळवणूक यांची देणगी दिली होती.

दिवंगताच्या पत्नीला मुलांसहित घरातून कुणीतरी हाकलून देते. ती त्याच स्मारकमंदिराच्या आश्रयाला रात्र घालविण्यासाठी येते. पण सकाळी तेथला राखणदार जेव्हा मंदिर झाडायला येतो तेव्हा तोही त्यांना तेथून हाकलून देतो. आणि हे स्मारकमंदिर आहे धर्मशाळा नव्हे असे सुनावतो. तत्त्वांची, विचारांची पूजा आणि पाळणूक माणसांकडून होत नाही. माणसांना माणूस म्हणून जगविणेही त्यांना शक्य नसते. निर्जीव दगडे आणि धोंडे तो जपत बसतो. चांगल्या तत्त्वांपासून, की जी अंगिकारल्यावर त्रासच पदरी पडतो, दूर राहण्याची ही पळवाट म्हणायला हवी. केशवसुतांचे 'मूर्तिभंजन' याचसाठी होते हे कळते. पण यशवंत हे जनसामान्यांचे-तुमचे आमचे कवी होते. म्हणूनच हाच विचार सत्याच्याच पातळीवर अधिक विस्तृत पण पाल्हाळीक नव्हे, तर पटणारा असा बनवून आपल्या पुढे मांडला आहे. कुसुमाग्रजांच्या 'पुतळा' किंवा 'जोतीराव' या अलिकडच्या काळातील कवितांशी साधर्म्य दाखविणारी ही कविता आहे तरी ती कितीतरी आधी (१९४० ला) लिहीलेली आहे. या कवितेत कुठे कलमी कारागिरी नाही, क्लिष्ट शब्द नाहीत, यमकांची खैरात नाही की भावगीताची गेयता नाही. धगधगता आशय लयबद्ध स्वरूप धारण करून तितक्याच धगधगीतपणे उभा ठाकला आहे. (दिवंगताचे स्मारक - पाणपोई)

राजसत्तेवरचे राजे उद्या भीक मागू लागतील - या सिंहासनाला लोकांनी मुजरे केले तेच सिंहान बाजारात लिलावात मांडले जाईल. सोन्याचे सिंहासन अढळ टिकणारे नव्हे; पण ऐश्वर्य आणि सत्तेचे धिंडवडे निघतात त्यामुळे त्याबद्दल वैराग्यवृत्ती धारण करून जो लोकोपकारास्तव चंदनाप्रमाणे झिजतो, चारित्र्य टिकवतो अशा महात्म्याला लोकांच्या हृदयात स्थान मिळते. हेच न ढळणारे अढळ सिंहासन.

सभोवतालची गर्दी, गोंधळ, गोंगाट, विषमतेची दृष्ये पाहून कंटाळलेली वाट शिसारी येऊन राजधानीतून पळत सुटते ती थेट गिरी, दरी आणि गर्द झाडीकडे एकांत शोधायला -

'तेथे मीच होते   मला सोबतीण

सवड सापडे   जाणाया मी-पण

(वाट - कमण्डलू)

गर्दी-धावपळीत स्वत्त्व विसरून आणि विरून गेलेल्या शहरातील माणसाचेच ही 'वाट' प्रतिनिधीत्त्व करत नसेल ना? असे स्वत्त्व हरवू नये म्हणून कवी नव्या पिढीला 'आवाहन' करीत आहे. झोपडी, प्रासाद सोडून कुंपणे ओलांडून क्रिडांगणी येण्याचे अंग झाडून घाम गाळण्याचे आवाहन करत आहे. जुन्या चालीरीती, रुढी-समजूती सोडून द्यायला सांगत आहे. विश्वशांतीसाठी 'विश्व माझे मी तयांचा' या तत्त्वाचा अंगिकार करावयास सांगत आहे.

वास्तवाचे काठिन्य आणखी एका प्रकारे कवी सांगतो. परमेश्वराने धारण केलेल्या अवतारात काही चमत्कार केले. पण तेही सुलभ होते. त्याहून कठीण असलेले चमत्कार आम्ही करतो.

'कितीतरी ऋणांचे गिरी माझिया शिरी

'गिरीधारी' म्हणुनी होते स्तुती तुझी वृथा श्रीहरी''

पृथ्वी सागरात बुडत असताना देवाने शेषाचा अवतार धारण करून तिला मस्तकावर तोलले पण जड वस्तू ही पाण्यात कितीतरी हलकी होते. तेव्हा हे काहीच नाही तू जर -

''संसार जगी सावरूनी दाखवी जरा

पुरुषार्थ तरी तुझा काही मग मानू धरणी धरा''

पायाला बाण लागून श्रीकृष्णाचा अवतार संपला. पण आमच्या रस्त्यात भाल्यांची फळे रोवलेली आहेत. त्यावरूनच आमची पदयात्रा चालली आहे.

''चरणांची चाळणहोते रक्ताळल्या

यमही न येई वाराया ज्या कळा जिवा लागल्या''

तर मग - ''ह्यापरी सर्वथा ग्रस्त मानवी जिणे

अवतार कथांचे कोणा तरी कौतुक अद्‌भुत गुणे ?''

(अवतार कथांचे कोणा कौतुक - कमंडलू)

यशवंतांची सामाजिक कविता उत्कट भावनेतून निर्माण झालेली आहे हे वरील कवितांवरून दिसते. त्यांच्या सामाजिक कवितेचे विशेष सामान्याने काहीसे असे देता येतील -

13307
A

**यशवंतांच्या सामाजिक कवितेचे निष्कर्ष :**

१. यशवंतांची सामाजिक कविता भावनाप्रधान आहे. रविकिरण मंडळातल्या इतर (विशेषतः गिरीश) कवींच्या कवितेसारखी ती प्रसंगपर नाही. त्यांच्या कवितेतील आशय विश्वव्यापी आहे.

२. त्यांची कविता सामाजिक दुःखाची जाणीव करून देण्यापेक्षा समाजातील उणीवांची जाणीव करून देते आणि त्यावर आपल्या औपरोधिक शैलीने कडाडून प्रहारही करते.

३. मात्र केशवसुतांच्या कवितेत आढळणारा ''जाळूनि किंवा पुरूनी टाका'' असला उद्दाम आवेश व्यक्त होत नाही. रंजल्या गांजलेल्यांच्या व्यथावेदना आवेशाने, चिडीने व्यक्त होत नाहीत.

उदा. करदा, गुलामांचे गाऱ्हाणे या कविता. तेथे कवितेमागची भावना सहानुभूतीची आहे असे दिसते. असहाय्य, दुर्बल, शोषीत अशी पात्रे त्यांच्या कवितेत विरळाच. आणि मुळात त्यांची कविता पात्रप्रधान नाहीच.

४. कटु वास्तवाची कटु जाणीव यशवंतांच्या कवितेत जाणवते. त्यामुळे कवितेला निराशावादी सूर लाभतो. तर काही कविता वास्तवाचे काठिन्य दाखविण्यासाठीच येतात.

५. वर्ग व वर्णवर्चस्वाचा विद्वेष करणाऱ्या कविताही यशवंतांनी केल्या आहेत. (भुकेची भिती कोणाला, अढळ सिंहासन) यातून शाश्वत चिरंतन अशा जीवनमूल्यांचे दर्शन घडते.

६. जगातल्या विसंगती आणि विकृतीचे औपरोधिक चित्रण यशवंतांच्या सामाजिक कवितेत येते.

७. ठराविक विषय पुन्हा पुन्हा आलेला नाही.

८. आगरकरप्रणीत बुद्धिवाद रविकिरण मंडळाने स्विकारला होता. आगरकरप्रणीत सुधारणा - विधवांचे परित्यक्तांचे क्लेश स्त्रियांची गुलामगिरी, अज्ञान, अवहेलना, कृत्रिम निर्बंध हे विषय यशवंतांच्या सामाजिक कवितेत आलेले दिसत नाहीत. अपवाद - बंदिशाळा (विधवांचा प्रश्न) हे खंडकाव्य.

९. एकच विषय पुन्हापुन्हा आल्याने तो नाविन्यपूर्ण वाटत नाही. यशवंतांनीही वास्तवतेचे कटुत्त्व दाखविणाऱ्या बऱ्याच कविता लिहूनही त्यात पुनरुक्ती झालेली दिसत नाही. त्यामुळे कवितेची परिणामकारकताही नष्ट होत नाही.

१०. निखळ भूतदयावादी दृष्टीकोनातून ही कविता आलेली नाही. स्वतः वास्तवाचे चटके खाऊन, टक्के टोणपे खाऊन ती आलेली आहे आणि अचूक निरीक्षणशक्ती तिच्या पाठीमागे आहे म्हणून ती जिवंत वाटते.

११. यशवंतांच्या कवितेतील समाजाची भयाण अवस्था नाविन्यपूर्ण, पहिल्यांदाच व्यक्त झाली आहे. अशा स्वरूपाची जरी नसली तरी प्रौढ अभिरूचीच्या वाचकालाही ती आवडेल अशीच आहे.

**प्रेम कविता**

माधव ज्युलियनांना 'प्रणय पंढरीचे वारकरी' म्हटले गेले आहे. गोविंदाग्रजांना 'प्रेमाचे शाहीर' तर यशवंतांना 'दुःखाचे शाहीर' म्हटले गेले आहे. जीवनातील दुःखाचे स्वर त्यांची कविता आळवत बसली असली तरी इतर बाबतीतही ती कमी पडली नाही. त्यांची प्रेमकविताही स्वतःचे स्वतंत्र्य, वेगळे अस्तित्त्व निर्माण करणारी अशीच आहे. प्रेमकवितेतही त्यांनी वास्तवाचे भान सोडलेले नाही. कल्पनेच्या उंचच उंच भराऱ्या त्यांनी मारल्या नाहीत. व्यवहाराच्या खडबडीत जमीनीवरून चालत जाणेच त्यांना अधिक पसंत पडले. पण सुरूवातीच्या काळातली त्यांची कविता स्वप्नाळू वाटते. कवी हा कविकल्पनेतच रममाण झालेला दिसतो. सखीच्या आगमनाची प्रतिक्षा आणि तिची भेट व्हावी यासाठीची तळमळ, मनातील प्रेमभाव तिच्याकडे व्यक्त करता येत नाही म्हणून होणारी तडफड, कल्पनेच्या साम्राजातील विहार अशा स्वरूपाची त्यांची सुरूवातीच्या कालखंडातील कविता आहे. 'यशोगंध' या संग्रहातील कविता याचीच साक्ष देते. गतायुष्यातील संपलेली प्रेमकहाणी, तिच्या आठवणीने व्याकुळ होणारे हृदय हाही विषय त्यात आला आहे. उदा. चमेलीचे झेले (यशोधन), प्रेमाचे स्मारक (यशोधन), चंद्रग्रहण (यशोगंध), शिलालेख (यशोधन), एक वर्षानंतर (यशोधन), संक्रांतीचा तो दिवस (पाणपोई) इत्यादी कवितांतून हा आशय व्यक्त होतो. सुरूवातीच्या कवितांतून स्त्री-सौंदर्याचे वर्णनही येते. पण कवीला केवळ शरीराचे सौंदर्य नको आहे.

''जिथे प्रभा सौन्दर्याची असे लाभलेली
तिथे रसिकतेची दृष्टी सदा गुन्तलेली'

असणारच पण -

''रूपसम्पदेहुनी ज्याचे जनन परी निराळे'

ते भाव तिच्या दर्शनाने त्याच्या मनात निर्माण व्हायला पाहिजेत. (मनमोहिनी - यशोधन)

पण सौंदर्याचे आकर्षण कुणाला चुकले आहे? स्त्रीसौंदर्याचे वर्णन यशवंतांनी केलेले आहेच. उपमा बहाल करण्याचे त्यांचे कौशल्यही यातून प्रतीत होते.

'पाणीदार विशाल लोचन तुझे रत्नेच तेजाब की'
'गाली नाजुकता तुझ्या विलसते प्राजक्तपुष्पापरी
पाहोनी अधरास पक्व फळ की हे वारुणीचे असे'
'शोभे कोमल उन्च कण्ठ तव तो शंखाकृती गोण्डस'

(रत्नाकर - यशोधन)

शाहिरी थाटानेही रमणीचे सुंदर चित्र काढले आहे -

''भरदार त्या बुचड्यावरी फुलला जरा बटमोगरा
सित पैठणी, लव आरूणी जरतारी शालु खुले बरा
कुरळ्या बटा पवनासवे हळू नाचती निटिलावरी
स्वकरांगुली फिरवून सावरसी तयां वरचेवरी
लवताच किंचित मान तो फिरतात लोचन नाचरे
चमके हिरा चमकीतला मन मोहणार न का बरे?''
(शीलवती सुन्दरीस - यशोधन)

तिच्या सौंदर्याच्या दर्शनाने कवीचे मन मोहून गेले आहे. पण स्त्रीसौंदर्याचे वर्णन त्यांच्या कवितेत विरळाच. शरीराच्या सौंदर्याबरोबर मनाचेही सौंदर्य त्यांना हवे आहे. ''प्रतिमालेखन' या कवितेत कवी प्रेयसीला स्थिर उभी राहण्यास सांगत आहे. त्याला तिची प्रतिमा काढून घ्यायची आहे. ती नायिकाही सुंदर आहे.

'नासिक तजेला, त्यात मोरणी खुले
ते मृदुल लालसर कान किती कोवळे''

तिचे कपोल आरुणी आहे, ''रत्नास मृदुलता देही तव लाभली''

अशी ती नाजूक आहे. पण यशवंतांना या शरीरी सौंदर्याचे वर्णन पुरेसे वाटत नाही म्हणून -

''तू नससी भीरू, नससी वा उद्धता
ती विनयशीलता वादवी तव चारूता'' (प्रतिमालेखन - पाणपोई) असे तिचे गुणविशेषही सांगतात. सौंदर्यासोबत हेही गुण तिच्यात आहेत. म्हणून तिच्या संगतीत हे जीवन उत्सव अथवा पर्वणी होईल असे कवीला वाटते. या भावनेचे शेवटचे टोक ''तूच रमणी'' या कवितेत गाठले आहे. शरीराचे सौंदर्य काळाच्या उदरात गडप होणारे आहे. 'तूच रमणी' या कवितेतील नायिका मृगाक्षी नाही, कमलनयना, पद्‌वदना नाही. नाक चंपककळीसारखे नाही की अन्य कसलेच सौंदर्य नाही कारण ही नायिका कष्टकरी आहे -

''उन्हातान्हामाजी जिने कष्ट करणे
तिच्या गाली पद्मासम कुठून लाली बहरणे?''

उलट असलेल्या सौंदर्याचीच हानी होणार. याची नायकालाही जाणीव आहे. तिची कुरुपताही त्याला भावते. कारण बगीच्यापेक्षा पिके देणारी बावनकशी जमीन चांगली अशी नायकाची श्रद्धा आहे. म्हणूनच त्याची प्रेमनिष्ठा ढळत नाही.

''कितीही सौंदर्याद्धत झळकल्या मूर्ति भुवनी

तुझ्या व्यंगानेही मग सहचरी तूच रमणी''

(तूच रमणी - पाणपोई)

पण ही श्रद्धा वास्तवात दिसून येईलच असे नाही. वास्तवातील चित्र काही वेगळेच असते. हे कवीला जाणवते आणि तो उद्‌विग्न होतो.

''प्रेमे लाभे प्रेमळाला

कायदा हा पूर्ण खोटा

प्रेम लाभाया हवा की

रूप राज्ञीचा मुखोटा''

(गीत माझे रूप तुझे - कमण्डलू)

गतकालातील प्रेमस्मृती त्यांच्या मनात थैमान घालतात. त्याचेही चित्रण यशवंतांनी कवितांतून केले आहे. ते प्रेम अथवा प्रेयसी जवळ नसली तरी तिच्या आठवणी त्यांच्या सन्नीध आहेत आणि तो कवीच्या जगण्याचा आधार आहे. म्हणूनच तिने दिलेले चमेलीचे झेले त्याने जपून ठेवलेले आहेत. त्या झेल्यावर तिची नजर पडताच ते पुन्हा ताजेतवाने होतील पण तिची भेट घडत नाही. हेचमेलीचे झेले (वाळलेल्या पाकळ्या) त्याच्याकडून हरवले तर त्याला मृत्यूला जवळ करावेसे वाटेल. कारण त्या चमेलीच्या फुलात त्याला तिच्या मुखावर विलसणारी चारूता आणि मधुरता दिसत आहे. प्रेयसी जवळ नसली तरी तिच्या आठवणी ही चमेलीची फुले देतात. त्यामुळे ती त्याला अधिक प्रिय आहेत. प्रेयसीचे लग्न झाले आहे. श्रीमंतीच्या वेदीवर तिचा सौदा झाला आहे. तिचे दर्शनही त्याला नकोसे झाले आहे. (एक वर्षानंतर - यशोधन). प्रेयसीचे लग्न झाल्याने झालेला प्रेमभंग म्हणजे जणू आयुष्याला लागलेले ग्रहणच. नोकरीच्या किंवा शिक्षणाच्या निमित्ताने नायक परगावी गेलेला. पण इकडे प्रेयसीचे लग्न झालेले. त्याला या वस्तुस्थितीची जाणीव नाही. तो तिकडे तिच्यासोबतीची स्वप्ने पहात बसलेला !

'भाग्याचे इमले मनी उठवले - अज्ञात वस्तुस्थिती

होता व्यक्त अशी समोर - जळणे, रक्षा उरे शेवटी'

(चंद्रग्रहण - यशोगंध)

एका अर्थानि संपलेल्या पण पत्ररूपाने उरलेल्या प्रेमकहाणीचा शेवट 'पत्रिकावहन' मध्ये पत्रांना अग्निसंस्कार देऊन कवी करत आहे.

पण त्या अग्नीत केवळ तो कागद जळत नाही. समोरच्या अग्नीप्रमाणेच

''पेटे अन्तरि अग्निकुंड, जळतो त्याच्यामध्ये तत्पर'

प्रेमभंगाने आलेली व्याकुळता बऱ्याच कवितांतून आली आहे. ही व्याकुळता आणि हुरहूर शेवटपर्यंत राहिली आहे. 'कमण्डलू'' या उत्तरायुष्यातल्या काव्यसंग्रहातही

''होता तुझी आठवण

मनी माजतो गोंधळ

तोच अबोध गोंधळ

करी जीवाते व्याकुळ''

(होता तुझी आठवण - कमण्डलू)

ही भावना आहे. प्रेयसीशी केलेल्या प्रेमचाळ्यांचे वर्णनही येते. ''ढलपी'' (कमण्डलू) कवितेत अंगणात अंघोळीचे पाणी तापवत बसलेल्या नायिकेशी केलेल्या बालीश प्रेमचाळ्यांचे चित्रण तर ''अजुनी वाटते'' मध्ये ओढ्यावर धुणे धुवायला आलेल्या नायिकेच्या अंगावर पाणी उडवून दाखविलेला रानदांडगेपणा याचे वर्णन आहे. जानपद गीतातील अद्‌भूतरम्यता यात व्यक्त झाली आहे. गतकाळातील प्रेमस्मृतीला उजाळा देणारी आणखी एक कविता म्हणजे ''संक्रांतीचा तो दिवस'' (पाणपोई)

''मज्जीवनातील ती रमणीय एका

संक्रांतीचा तो दिवस तुला आठवतो का?''

तो दिवस तिच्या सतत स्मरणात रहाणारा आहे. याप्रमाणे बऱ्याच कवितांतून गतकाळातील प्रेमस्मृती चित्रीत केल्या आहेत. त्या सफल विफल प्रेमाच्या आहेत.

**प्रेयसीची आळवणी** बऱ्याच कवितांतून केली आहे. तिच्याशिवाय जीवनाला अर्थ उरणार नाही. जीवनात आनंद निर्माण होणार नाही. म्हणून कवी प्रेयसीची आळवणी करीत आहे. त्याच्या मनात तिजविषयी प्रेम आहे. पण ते व्यक्त करता येत नाही. एकटा असताना तिजसोबतच्या कल्पनांचे इमले बांधायचे पण ती समोर येताच ओठातला आशय ओठातच रहायचा. तिची भेट घेण्यास ही त्याचे पाऊल अडखळते.

''लागे मानस घ्यावया उचल हे भेटावयाते तुला

ठेवी आतुन आडवून न कळे माझी कुणी पाऊले''

(स्वप्नसंभ्रम - यशोगंध)

याला कारण त्याचा संकोची स्वभाव. तिच्याबद्दल माझ्या ह्रदयात काय भाव आहे तो माझा मला उमगत नाही पण एक मागणे आहे

'घन नभि माझीया गेही त चमक शुक्रचांदणी'

रिकामी जिवीत नौका कुणीतरी भूषवावी. कुणाचीतरी साथ मिळावी. त्याच विचाराने तो सैरावैरा झाला आहे. ती एकच प्यास त्याला लागून राहिली आहे. त्याची वाट पाहणारं त्याच्या पुरुषार्थाला प्रेरणा देणारं, आपल्या नेत्रबाणांनी घायाळ करणारं असं कुणीतरी त्याला पाहिजे आहे.

''राहे की पुरषा जरी बिलगुनी वृथा जशी वल्लरी

आहे तारक तीच शक्ती मनूजा तत्राचि नानापरी''

(तारिणी -यशोगंध)

यासाठीच तो तिचे निरंतर सान्निध्य मागतो आहे. जीवनसाथी मिळविण्याची ओढ त्याला लागली आहे. हाच आशय 'संसार सखी' कवितेतून व्यक्त होतो.

''तुझी मिळेल जरी जोड जिविती मजला

उठेल का न सुखाचा सदा नवा मजला'' (संसारसखी - यशोगंध)

तिच्या येण्याने सारे जीवन सुखमय होणार आहे. तिच्या मैत्रीने सारे सुख मिळते. ह्दयातील तिमीराचा नाश होतो म्हणून

''कशाचाही आता तरि धरू नको आड-पडदा

त्वरे घेई लोकत्रयि मजसि सौभाग्य -वरदा''

(आवाहन १- यशोगंध)

मी दीन दरिद्री असलो तरी प्रेमाचे अलोट धन आहे. माझ्याजवळ तुझ्या शृंगारासाठी सोने, हिरे नाहीत पण मी तुला जिवाभावाचा बिन्दी-बिजवर चढवीन आणि त्यात तुझ्यासाठी रत्नाकरासारखी महाउदार असली की मग उणीवांची बाधा ती कुठून होणार मग -

कशासाठी आता अडुनि बससी सांग सुभगे

करी चित्ती हिय्या चल जिवलगे, वेळ नलगे (आवाहन - यशोगंध)

पण तिची एवढी आळवळी कशासाठी तर त्याच्या नशीबी

''दुःखांतच अपरंपार काळ कण्ठणे

अन जाति सुखद परि काही तव आगमने दर्शने ''

(स्फूर्तिदेवता - यशोगंध)

मग माझी कायमचीच सखी का होत नाहीस. तू माझी स्फूर्तिदेवता आहेस. तुझ्या संगतीने माळही फुलून जातील. आणि माझ्यासाठी तर सर्व सुखाची कवाडे खुली होतील. म्हणून तू माझ्यासाठी आलेच पाहिजेस आणि माझ्या या विनंतीत गैर असे काय आहे? कुणीही तुला माझी विनंती मान्य करायला सांगतील. कारण माझी विनंती सार्थच आहे. माझे जीवन म्हणजे धारेला लागलेली नाव आहे. ती बुडू लागली आहे. पण या बुडू लागलेल्या माझ्या जिवितनौकेला केवळ तूच तारू शकतेस.

'हे तीरावरल्या बाले

लागली नाव धारेला

जरि आणुनि टाकशील दोर

येईन सावरावयाला !'

(हे तीरावरल्या बाले - यशोगंध)

प्रेयसीवाचून जीवनाला पूर्णता येणार नाही, सुख निर्माण होणार नाही अशी कल्पना कवीने उराशी बाळगल्याचे या कवितांतून दिसते. हा आशय व्यक्त करणाऱ्या बऱ्याच कविता यशवंतांनी लिहील्या आहेत. पुनःपुन्हा तोच आशय व्यक्त होत असल्याने पुनरुक्तीचा दोष निर्माण होतो. हा दोष एकट्या यशवंतांचा नाही.... '' 'प्रेम' हा त्यांच्या (रविकिरण मंडळाचा) नाजूक जिव्हाळ्याचा विषय होता. तिचे नुसते बघणे, तिचे चालणे, बोलणे; सर्व शब्दबद्ध करण्याची धडपड. प्रेमासंबंधीच्या उथळ कल्पना उराशी बाळगल्याने धड 'काव्यही' निर्माण झाले नाही की प्रेमाचेही नीट आकलन झाले नाही.'' (३)

आत्तापर्यंत पुरुषाने निवेदन केलेले प्रेम पाहिले. आता त्यांच्या प्रेमकवितेतील स्त्री काय म्हणते किंवा तिचे स्वभावविशेष काय आहेत ते पाहू. त्यांच्या प्रेमकवितेतली स्त्री ही सर्वस्व उधळून प्रेम करणारी, समाजाचे प्रतिष्ठेचे बंध झुगारून देणारी, त्याच्या सुखदुःखात त्याला पूर्ण साथ देणारी, पतीची वाट पहाणारी आणि गलबल्यानं दोघांना एकांत मिळत नाही म्हणून कुरकुर करणारी, अशी संसारी स्त्री ही आहे. जगाची पर्वा न करणारी - स्वानंद साम्राज्ञी, पराक्रमी पुरुषाची राख बनून राहण्यातच धन्यता मानणारी, त्याला देव मानून पुजणारी, अशा स्त्रिया आहेत.

दूर राहून प्रेम करणारी स्त्री प्रियकराची एक प्रतिमा तयार करून त्याची पूजा करते. त्याचं मानवरूप तिला परवडणारं नाही. त्याच्याकडून काही प्रमाद घडला तरी अनन्य भक्तीमुळे ती तो समजून घेईल पण जनतेची कुत्सित कुजबूज तिला असह्य होईल म्हणून

''पुजारिणीस्तव नका उत्तरु परि

प्रभुजी ! मानवतेच्या कूपी ''

(पुजारिणीचा भाव - कमण्डलू)

अशी विनंती ती त्याला करते. त्याचं देवतारूप तिला जपायचं आहे. प्रियकर जशी प्रेयसीची आठवण करताना दिसतो तशी प्रेयसीही त्याची आळवणी करते.

'' शोभेशी न तुला जरी

लोटू नको राया दूरी

परिसाची तुझी थोरी

होईन मी कांचनाची जरी असे लोह ''

(गुन्हेगारिण - पाणपोई)

त्याच्या प्रेमासाठी तिने सारे बंध झुगारले. ती त्यामुळे गुन्हेगार ठरली. पण त्याचा केव्हा ना केव्हा तरी प्रतिसाद मिळेल अशी आशा तिला आहे.

अगदी उघडरीतीने आपला प्रेमभाव व्यक्त करणारी 'एक मस्तानी' म्हणते -

''ही तुझ्याचसाठी दौलत सारी राया

का लपवू मग ही नजरेपासुनि तुझिया ?''

तिचा धीटपणा दीपवून टाकणारा आहे. तिचा प्रियकर एक रणझुंजार आहे. युद्धात त्याला झालेल्या जखमा ती धुवून टिपून घेईल, त्याची शुश्रुषा करेल. त्याची समशेर ठेवील. सर्व समारंभात त्याची पत्नी त्याच्या सोबत असेल. पण जेव्हा श्रमभार हलका करण्यासाठी त्याची पाऊले तिच्या मंदिराकडे वळतील तेव्हा - राहीन आणि तव 'राख' पदात कृतार्थ असे ती म्हणते. (एक मस्तानी - ओजस्विनी) ही नम्रता इतकी पराकोटीला जाते की जरी त्याने तिला दूर लोटले तरी तिच्या मनात त्याच्याविषयी खेद नाही. इतर लोकांकडून त्याची निंदा होत असली तरी ती त्या निंदेत कधी सहभागी झाली नाही. उलट सर्वांपासून दूर त्याच्या प्रेमसंकिर्तनातच गुंग झाली आहे. (स्वानंद - सम्राज्ञी) स्वतःकडे कमीपणा जशी ही प्रेयसी घेते तशी समानतेचा हक्कही मागते. तिला जपणूक नको आहे. त्याच्या बरोबरीने तिची कष्ट करण्याची तयारी आहे. त्याचे प्रेम तिला पांगुळगाडा होऊ नये अशी तिची तगमग आहे.

पतीच्या जीवनाच्या वाळवंटात अमृताचे झरे तिने निर्माण केले. त्याच्या तप्त आयुष्यात गारवा निर्माण केला. तो चुकत असता तिने चातुर्याने त्याला सन्मार्गाला लावले. चुकांना क्षमाशीलतेने निवारले. अशी ही पत्नी 'भाग्यशाली जोड' ठरली.

पराभूतपणाच्या इंगळ्या त्याच्या मनाला डंख मारायला लागल्या तरी त्यावर उतारा तिला माहित होता. म्हणूनच तो म्हणतो -

''तुझ्या प्रितीच्या दिव्य मन्दाकिनीला कधीही कधीही न येवो तुटी''

(भाग्यशाली जोड - ओजस्विनी)

यासोबतच पतीचा सहवास मिळत नाही म्हणून कुरकुर करणारी एक गृहीणीही आहे. मोठ्या कुटुंबामुळे किंवा पतीच्या सामाजिक कार्यामुळे त्याच्याभोवती लोकांचा सतत गराडा असतो. त्यामुळे हृदयातील भावना व्यक्त करता येत नाहीत ही तिची तगमग आहे. ''प्रेमाची दौलत'' मध्ये तर पती प्रेमाचा एक निराळाच उदात्त आदर्श उभा केला आहे. या कवितेतील स्त्रीचा पती वारला आहे. पण तरीही तो वापरत असलेल्या वस्तू ती घेऊन कुरवाळत बसते. त्याचं मुंडासं, मोरवेलीची काठी, त्याची वाकळ, जोडे हे सारं तिला प्राणाहून प्रिय आहे. तिच्या पोटात त्याचा अंश वाढतो आहे. तो मोठा झाल्यावर -

''हे घालून त्याला पाहीन डोळं भरूनी

मग खुशाल तिरडी बान्धा माझी कोणी''

पतीचा पुनर्जन्म तिला पहायचा आहे. जामपद जीवनातील स्त्रियांचे प्रेम 'न्यारीचा वकुत' झाल्या तिन्हीसांजा, प्रतिक्षा, घरधन्यास इत्यादी कवितांतून प्रकट होतो. 'न्यारीचा वकुत'मध्ये नांगरावर गेलेल्या घरधन्याची न्याहारी लगबगीने घेऊन जाणारी स्त्री आहे. त्याच्या भुकेची जेवढी तिला काळजी आहे तेवढीच श्रमाने घामेजलेले त्याचे मुख पाहण्याची ओढही आहे. शेतातून घली येणाऱ्या घरधन्याची वाट पहात बसणारी स्त्री 'झाल्या तिन्हीसांजा' मध्ये तर बाहेरगावाहून बऱ्याच दिवसांनी पती येणार म्हणून जरा दार वाजले तरी उठून दार उघडायला धावत जाणारी पण तशीच रिकामी माघारी परतणारी स्त्री 'प्रतिक्षा'मध्ये तर दूर देशी पतीवर रागावून गेलेल्या 'घरधन्यास' मुले तुमची आठवण काढतात. मुलांसाठी तरी तुम्ही घरी या अशी विनवणी करीत आहे.

आपुलीया रोषे मज उभी फोडा किंवा जाळा

परिसात भुकेजल्या लेकारां या कुरवाळा

आपल्या प्रियकराबद्दलचे प्रेम या प्रेमिका अधिक उत्कटतेने व्यक्त करतात. एक प्रेमभंग झालेली स्त्री. कठोर वास्तवाचे दर्शन घडविते.

''प्रेम लाभे प्रेमळाला

कायदा हा पूर्ण खोटा

प्रेम लाभाया हवा की

रूप राज्ञीचा मुखोटा'

(गीत माझे, रूप तुझे - कमंडलू)

पण त्याने जरी तिला झिडकारून दुसरीशी लग्न केले असले तरी तिला तिच्याबद्दल हेवा वाटत नाही. कारण तिचे प्रेम तो अजून विसरला नसेल अशी तिला आशा आहे. तिच्या प्रेमाची ताकद ती जाणून आहे.

यशवंतांच्या प्रेमकवितेतील प्रेमिक रुळलेली वाट सोडून आपली निराळीच वाट निर्माण करतात. समाजाचे कट संकेत झुगारून देतात. त्यांचे एकच गीत असते -

''मन ओढाळ हे गुरु     पाढा घोकोत पढीक

मन मराळ पाखरू     तुला मलाच माहित.'

रुढीने बद्ध केलेले निव्वळ शरीराचे मिलन काय कामाचे? हृदयाचे, मनाचे मिलन हेच खरे, मनाची मनाला साक्ष पटली. दोघांच्या आवडीनिवडी तंतोतंत जुळल्या तर त्यांनी सहजीवनाला सुरूवात करायला काय हरकत आहे. (मन मराळ पाखरू - ओजस्विनी)

या प्रेमिकांचे मन स्वप्ने उराशी कवटाळून चालत रहाणारी आहेत. त्यांच्यावर हितबोध सांगून काही उपयोग होणार नाही. त्यांचा एकच घ्यास -

''वाट असो काटेरी,     रणरणोत गरम झळा

काय तमा, चाले जो     चिंतित स्वप्नेंदु - कला ?''

''कुंद हवा गमत तया     गंधमयी सुखशीतल

कितिहि पडो शोष, तया  भान कुठे ? तो न नविकल.''

(स्वप्न पाहिलेस, मना - कमंडलू)

ही त्या प्रेमिकांच्या मनाची प्रकती आहे. ते जहराला काय जुमानतील? अशांच्या कपाळी वंचना आणि निंदाच येणार पण-

''लौकिकाच्या भयाची का घ्यावी लागोनिया तंत'

(मनमराळ पाखरू - ओजस्विनी)

असा मंत्र ते घोकत असतात.

अशाप्रकारे यशवंतांची प्रेमकविता विविधतेने नटलेली आहे. मात्र त्यांची प्रेमनिष्ठा एकनिष्ठ आहे. कल्पनेच्या उंचच उंच भराऱ्या त्यांनी मारल्या नाहीत. पण म्हणून ती रमणीय उतरली नाही असे नाही. प्रिय व्यक्ती हेच आपले विश्रांतीस्थान अशी भावना बऱ्याच कवितांतून व्यक्त होत असल्याने पुनरूक्तीचा दोष उत्पन्न होतो. असे काही दोष दिसत असले तरी काही गुणही आहेत.

**यशवंतांच्या प्रेमकवितेचे वेगळेपण**

१. प्रेमभावना संयमित स्वरूपात व्यक्त होते. स्त्रीदेहाचे अथवा शृंगाराचे वर्णन फारसे नाही. एखादेच अपवादात्मक.

२. प्रेम निराशेनंतर पूर्वीचा प्रियकर भाई बनतो अशी तत्कालिन विशेषता माधव जुलियनांच्या कवितेतील कल्पना यशवंतांच्या कवितेत नाही.

३. प्रेमाची गाढ भावना प्रतीत होते. केवळ यौवनविभ्रमाने घायाळ झालेले प्रेम नाही. त्याचे त्याला आकर्षणही नाही. देखाव्यापेक्षा अंतःकरणाला आणि अंतरंगाला महत्त्व देणारी प्रेमनिष्ठा आहे. त्यामुळे प्रेमकविता परिणामकारक ठरते.

४. प्रेमाच्या आड समाज येतो. म्हणून समाजावर आरोपही केले आहेत. मात्र ते अवास्तव वाटत नाहीत.

५. प्रिय व्यक्ती हेच आपले विश्रांतीस्थान ही भावना रविकिरण मंडळातल्या इतर कविंच्या कवितातल्या प्रमाणेच यशवंतांच्या कवितेतही आढळते.

६. प्रेमभावना संयत स्वरूपात व्यक्त होते. हृदय भाजून काढणारी विरहव्याकुळता, मिलनासाठी वाटेल ते दिव्य करण्याची तयारी हे त्यांच्या कवितेत नाही. पण तरीही त्यातील अनुभवाची सत्यता सहृदय वाचकाच्या मनाला पटते.

७. सुरूवातीच्या काही कवितात भेटीसाठीची आतुरता मनातील भाव व्यक्त न करता आल्याने होणारी तळमळ, ही भावना आहे. नंतरच्या कवितात मात्र प्रेमभावना पत्नीशी निगडीत झालेली आढळते.

८. यशवंतांच्या प्रेमकवितेतील नायक नायिकेच्या शारीरिक सौंदर्यपेक्षा तिच्या भावसौंदर्यावर लुब्ध झालेला दिसतो. कुरूप नायिकाही प्रेमामुळे सुंदर वाटते. उदा. तूच रमणी ही कविता.

९. तर नायिका / स्त्रिया सर्वस्व झोकून प्रेम करणाऱ्या, प्रतिष्ठेला झुगारून देणाऱ्या, पुरुषाच्या पराक्रमावर प्रेम करणाऱ्या प्रियकराची प्रतिष्ठा अबाधित राखण्यासाठी धडपडणाऱ्या, शरीराने दूर असूनही अंतरातील प्रेम चिरंतन ठेवणाऱ्या स्त्रियाआहेत.

१०. स्त्रीसौंदर्याचे वर्णन फारच थोड्या कवितांत आले आहे आणि तेही खूप संयमितरित्या व्यक्त झाले आहे. आणि जिथे शरीरसौंदर्याचे वर्णन आले आहे तिथे भावसौंदर्याचे वर्णन करायलाही ते विसरलेले नाहीत.

११. पत्नीविषयक प्रेमकवितात लेखनगर्भ आत्मनिष्ठेचा प्रत्यय येतो.

१२. प्रेयसीला विविध नावांनी पुकारलेले आहे. - मनोदेवता, स्फुर्तिदेवता, सुदामाषिणी, मनोवासीनी, संसार सखी इत्यादी जीवनातील नैराश्य केवळ तिच्या आगमनाने नष्ट होईल अशी आशा बऱ्याच प्रेमकवितांतून व्यक्त झाली आहे. या आशेचे निराशेत रूपांतर झालेले दिसत नाही. ही आशा पूर्ण झाल्याचे, पूर्तीच्या सुखाचे दर्शन पत्नीविषयक प्रेमकवितेतून दिसतेच.

१३. प्रेमकवितांतून पूर्वकालिन स्मृती रंगविताना अद्‌भूतरम्यतेचा स्पर्श झाला आहे.

**ऐतिहासिक कविता**

इतिहासाचे आकर्षण यशवंतांच्या मनाला आहे. इतिहासातील महापुरुषांच्या पराक्रमाच्या गोष्टींपुढे ते भक्तीभावे नतमस्तक होतात. इतिहासाची ओढ हा बालवयातील संस्कारांचा सुपरिणाम असेल. राष्ट्रवादी कीर्तने ऐकल्याचाही परिणाम असेल. पारतंत्र्याच्या काळात परकीयांशी झुंजताना पूर्वजांच्या पराक्रमाचे पोवाडे नवीन पिढीच्या कानावर पडले तर त्यांच्यात नवा जोष, नवा आवेश संचारेल अशी आशा असावी, पण केवळ एवढाच उद्देश मनात ठेवून हे लेखन झाले नसावे. त्यांच्या मनात इतिहासाबद्दल श्रद्धा आहे व त्यांची ऐतिहासिक कविता त्यांच्या या श्रद्धाशील मनाचाच परीपाक आहे.

रसिकांच्या नजरेत यशवंत भरले तेही 'देहाचा पूल' या ऐतिहासिक कवनानेच, १९२१ साली भरलेले दहावे मराठी साहित्य संमेलन ह्या कवनाने गाजवले. त्यानंतरही त्यांनी काही ऐतिहासिक कविता लिहील्या. त्यातूनही त्यांचं श्रद्धाशील मनच प्रत्ययाला आलं. राणी लक्ष्मीबाई आणि छत्रपती शिवाजी महाराज या विभूतींबद्दल तर स्वतंत्र काव्ये (रणदुर्गा झाशीवाली, छत्रपती शिवराय) निर्मून त्यांना भक्तीभावानं श्रद्धांजली वाहीली. यातील भाव केवळ श्रद्धेचाच नाही तर प्रत्येक महाराष्ट्रीयाला असावा असा यथोचित अभिमानही आहे. 'देहाचा पूल' कवितेचा विषय त्यांच्या मनाला भावला. विजापूर दरबारातला मुसलमान सरदार पुण्याजवळ शिवापूरला आला त्याचं परिपत्य करण्यासाठी महाराज चालून आले. पण खानाने स्वयंसंरक्षणार्थ छावणीभोवती खंदक खोदून त्यात लाकडं पेटवून दिली होती. तो आगीचा खंदक ओलांडण्यासाठी चार मावळ्यांनी आपल्या देहाचा पूल करून दिला. या आत्मत्यागाचे, स्वामीनिष्ठेचे, स्वातंत्र्यभक्तीचे जे चित्र कविने रंगविले आहे ते कोणाचेही हृदय उचंबळून टाकणारे आहे. इतिहासातील पराक्रमाचे वर्णन चैतन्य देणारे ठरावे असा या कवितेमागील हेतू आहे.

''पूर्वीच्या इतिहासाचे उलटतां पान एखादे
फुरफुरती आमुचे बाहु जरि गुलाम झाले बन्दे
समशेर मुठीत न आत लेखणीचे करितो धन्दे
जी नसांनसांतून बिजली
तेधवां सदा सळसळली
हतवीर्य आज ती झाली.''

म्हणून एखाद्या कुत्र्याचे जीणे आम्हाला लाभले आहे. त्यासाठीच इतिहासातील पराक्रमाचे पोवाडे आजही गावयाची गरज आहे असे कविला वाटते.

शिवाजीने आपली मान वळविण्याचा अवकाश की - ''तो उभे राहिले भाले ! रिपुकधिरास्तव तान्हेले'' छावणीवर तीनशे मावळ्यांसहित शिवाजीमहाराज चाल करून गेले पण आत प्रवेश करता येईना कारण खानाने छावणीभोवती आगीचा खंदक करून ठेवला होता. तो विझवायला जवळ ओढेही नव्हते. सर्वजण मोठ्याच अडचणीत सापडले. त्यावेळी शिवरायांनी -

"खन्दकावरी जाळी कोण

आपुले देह टाकून

मज देईल पूल करून ?"

असे विचारताच -

" निघताच शब्द बाहेर जन निजले त्यावरि चार

त्यांचिया शरीरावरूनी छावणीत सगळे घुसले."

खानाचा पाडाव केला. बिछान्यावर झोपावे तितक्या सहजपणे हे मावळे आगीच्या खंदकावर झोपले. त्यांची झालेली तगमग, किंवा त्यांच्या आत्मत्यागाच्या कृत्याने इतरांच्या मनाची तगमग कवितेतून व्यक्त झाली नाही त्यामुळे त्यांनी फारसे काही केले असे वाटू शकत नाही. आशय जरी मनाचा ठाव घेणारा असला तरी कवीला तो व्यक्त करता आला नाही. त्या चार मावळ्यांचा आत्मत्याग अलौकिकच होता. पण आज मात्र त्यांच्या आत्माहुतीची स्मृतीच केवळ उरली आहे. शेवटी कवी वाचकांना प्रश्न करतो -

"इतिहास आज हा श्रवता

वाटेल खन्त जरि चित्ता

तरी मनन करावे आता

कां स्वराज्य झाले     का स्वराज्य सम्प्रत नुरले?" (देहाचा पूल - यशोधन)

शूर देशभक्तांचा काळ शिवाजींच्या वेळी होता असे नाही. इंग्रजांच्या विरूद्धच्या स्वातंत्र्यसंग्रामातही तो होता. झाशीची राणी लक्ष्मीबाई हिने गाजविलेल्या पराक्रमालाही इतिहासात तोड नाही. म्हणूनच "रणदुर्गा झाशीवाली" हे स्वतंत्र काव्यशिल्प निर्मून यशवंतांनी तिला श्रद्धांजली वाहीली. या काव्याची रचना पारतंत्र्याच्या काळात झाली नसली तरी कुठल्याही काळात तिच्या धाडसाची प्रशंसा व्हावी.

राणीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतचा कालखंड यात आहे. तिची जडणघडण बालवयातही भातुकलीच्या खेळात न रमता शारीरिक कसरतींवर, व्यायामावर दिलेला भर, तिने गोळा केलेली सखी सेना, त्यांना हाक घालताना स्त्रीजन्माचा तिने सांगितलेला वेगळाच अर्थ आणि तिने गाजविलेला पराक्रम यातून नकळतरित्या स्त्रियांना संदेश मिळतो. या काव्याची रचना खंडकाव्य स्वरूपाची नाही. प्रसंगानुरूप वेगवेगळ्या स्वतंत्र कविता लिहीलेल्या आहेत. त्यामुळे एकाच कवितेत पुनःपुन्हा तोच तो आशय व्यक्त झालेला आहे.  त्यामुळे पुनरावृत्तीचा दोष निर्माण झालेला आहे. कवितेत व्यक्त केलेला आशय कवितेच्या अगोदर गद्यात सांगितलेला

आहे. त्यामुळे गद्यातील आशय पुन्हा कवितेत वाचताना फारसे काही नवीन व्यक्त झालेले आहे असे वाटत नाही. पुनरावृत्तीचा दोषही निर्माण झाला आहे. उदा. 'व्यर्थ जन्म हा बायकी' ही कविता कथानकाचा सांधा गद्य निवेदनाद्वारे जोडण्याचा प्रयत्न केला गेला आहे. तसेच प्रसंगाचे गद्यात निवेदन करून नंतर कविता लिहीली आहे. त्यामुळे प्रसंग आणि त्यांचे पद्यातील रूपांतर याचा टीकात्मक अभ्यास नकळतपणे वाचक करू लागतो.

स्त्रीच्या अंगी स्वाभाविक असलेले दुबळेपण झटकून टाकून गाजविलेला पराक्रम, पारतंत्र्याची, गुलामगिरीची चीड हा आशय यातून परिणामकारकतेने व्यक्त झालेला आहे. तिच्या पराक्रमाने डोळे दिपून जातात. रणांगणातच लढता लढता मरण आले. तिच्या अंत्यसंस्काराला चंदनाची लाकडेही मिळाली नाहीत. पर्णकुटीच्या दर्भाची चिता तिला मिळाली.

''त्या दिवसापासूनी हिंपुटी झाले चंदनतरु

लागले अंतर्यामी झुरू :-

''आम्हीच तिचिया सरणासाठी निज काष्ठा अथक''

गंज जळाली, परि जळलेल्या गवताचे कणकण

राहीले भारतात विखरून

फुलवित तेजोहातांचिया मर्नि अंगारा निशिदिन.''

इतिहासातील पराक्रमी व्यक्तींचे गौरवगान करण्याची ओढ या काव्यातून दिसते.

**छत्रपती शिवराय**

हे काव्य यशवंतांनी महाराष्ट्रमातेस वाहिलेली श्रद्धांजलीच होय. या काव्याच्या निर्मितीमागची प्रेरणा एकच एक नाही असे खुद्द कवीच काव्याच्या प्रस्तावनेत सांगतो - ऋणमुक्ती हा एक हेतू

१. ज्या देशात मनुष्य जन्माला येतो त्याचेही ऋण त्याच्या मस्तकावर असते. जननीच्या खालोखाल जन्मभूमी. महाराष्ट्रात मला जन्म लाभला हे माझे पुर्वसुकृत होय. ह्या पूर्वसुकृताचा नुसता अभिमान मिरवणे ही इतिकर्तव्यता नव्हे - अर्थात महाराष्ट्राचे ऋण फेडायचे म्हणजे महाराष्ट्र निर्मात्याचे विक्रमचरित्र आलापायचे असेच नव्हे का? त्यापैकी श्रीसमर्थ रामदासांचे संकीर्तन झाले. (श्रीसमर्थ रामदास - एक अभ्यास हे पुस्तक) दुसरा महापुरुष शककर्ता, युगनिर्माता, श्रीछत्रपती त्यांचे संतर्पण या महाकाव्याचे द्वारा करून मी ऋणमुक्ती साधण्याचा यथाशक्ती प्रयत्न करीत आहे.

२. छत्रपती शिवाजीमहाराजांचे स्थूल चरित्र सर्वश्रुत आहे. संशोधक त्यात काही नवीन भर घालून त्यांची रंगत व सधनता वाढवितात. तरीसुद्धा कवीला आणखी काही आणि तेही आगळे, महत्त्वपूर्ण व चित्तवेधक असे त्यातून दाखविता येते की जे इतिहास लेखकाच्या कक्षेत नसते.

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

३. महाराष्ट्राच्या या मर्यादापुरुषोत्तमाचे चरित्र गाऊन आपण शुचिर्भूत व्हावे आणि वाचकांना तो लाभ घेता यावा. इत्यादीह हेतू मनात ठेवून या काव्याची रचना झाली आहे.

या काव्याचा आकृतिबंध ५७ प्रकरणे, ५२१ पृष्ठे आणि १३,७२२ ओळी असा आहे. काव्याचा आकार मोठा असला तरी महाकाव्याच्या संकेतात तो बसत नाही. म्हणून कवी या काव्याला 'महाकाव्य' म्हणायला धजत नाही. पण - 'छत्रपती शिवाजीमहाराजांसारख्या महापुरुषोत्तमासंबंधी हे काव्य आहे असे म्हणायचे मी धारिष्ट करत आहे.'' (यशवंत) (४)

यशवंतराव चव्हाणांनीही या काव्याने मराठीतील महाकाव्याची उणीव भरून काढली आहे असे म्हटले आहे.

शिवरायांचे चरित्र बऱ्याचअंशी ढोबळमानाने तुम्हाआम्हाला माहिती असतेच. मग हे चरित्र पुन्हा सांगून कवीने काय साधले? इतिहास वस्तुनिष्ठ असतो. पण काव्यात उतरविताना त्यात नवीन भर टाकली जाते. पण ज्या विभूतीबद्दल 'छत्रपती शिवराय' हे महाकाव्य आहे ती महाराष्ट्राची मनोदेवता आहे. गेली तीनशे वर्षे महाराष्ट्रातील लहानथोरांनी पिढ्यान्‌पिढ्या ज्यांच्या पराक्रमाचा अभिमान बाळगला अशी ही मनोदेवता आहे. त्या मनोदेवतेला कुठेही धक्का लागणार नाही, व्यक्तिरेखेवर अन्याय होणार नाही, ऐतिहासिक सत्यही अबाधित राखले जाईल इतक्या हळूवारपणे काव्याची रचना केली आहे. त्यासाठी कवीला मोठा व्यासंगही करावा लागला आहे. विविध पुराणांतून घटना, सत्ये पारखून घ्यावी लागली आहेत. महाकाव्याचा लेखनकालही आठ वर्षे इतकी प्रदीर्घ कालावधी आहे. 'मराठ्यांचे महाभारत' या नावाने आगामी म्हणून घोषीत केलेले हे काव्य शेवटी 'छत्रपती शिवराय' या नावानेच प्रकाशित झाले. बा. सी. मर्ढेकरांसारख्या नवकवींलाही या काव्याच्या आगमनाबद्दल उत्कंठा लागून राहीली होती. या काव्याने यशवंतांनाही महाकवी होण्याचा बहुमान मिळाला.

मराठ्यांचा इतिहास आणि शिवरायांचे चरित्र, मावळे, त्यांच्या लढाया, गनिमीकावा, गड, किल्ले, यांचा आठव होताच कुणाही महाराष्ट्रीयाचे बाहु स्फुरण पावावेत इतका हा प्रेरणादायी इतिहास आजही प्रेरणा देत रहातो. तो काव्यात आणतानाही यशवंतांनी तितक्याच तन्मयतेने त्यांच्या आवेश, आवेगासह आणला आहे. त्यासाठी गतीमान भाषा वापरली आहे. मुस्लिमांच्या तोंडी त्यांची बोली घातली आहे. कवीचा स्वतंत्र हस्तक्षेप पुढे जाणवत नाही. मात्र कुठे पुराणातील कल्पनाही वापरल्या आहेत.

शिवचरित्रातील ज्या घटना आवेशपूर्ण, शिवरायांच्या पराक्रमाचे, बुद्धिचातुर्याचे दर्शन घडविणारे आहे. तिथे कवीप्रतिमा विशेष फुलून येते. या घटना अधिक विस्ताराने आपली रसमयता न हरवता आल्या आहेत. उदा. अफजलखानवध, सुरतेची लूट, आग्र्याहून सुटका, शिवराज्याभिषेक इत्यादी.

व्यक्तिनामे आणि स्थलनामे अचूक वापरली आहेत. त्यामुळे कवीची अभ्यासपूर्णता प्रत्ययास येते. उपकथानकांचाही शिरकाव झालेला आहे. त्यात सुरवातीला बालशिवाजीला जिजाबाईंनी सांगितलेल्या गोष्टी, त्यात कालियामर्दन हिरण्यकश्यप या गोष्टी विस्ताराने येतात. 'लूटीतील मोती' या प्रकरणातील बाळाजी या व्यक्तिरेखेचे उपकथानकही बरेच लांबले आहे. बाजारातील एका दृश्याने सुरवात करून कवीने या कथानकाला एक अद्‌भूतरम्यता आणली आहे. अफजलखान वधाच्या वेळीचे गतीमान

प्रसंगाचे वर्णनही तितक्याच गतीमानतेने मांडले आहे. ब्राह्मणाची हत्या हे महापाप अशी परंपरा चालते. पण जीवावर उठलेला अनितीनं वागणारा ब्राह्मण वध्यच म्हणून शिवाजीने कृष्णाजी भास्कराचा वध केला अशी कारणमिमांसाही दिली. त्याचबरोबर शिवरायांना घडविणारी जिजाबाई आपल्या पहिल्या पुत्राला का घडवू शकली नाही याचे समर्पक उत्तर यशवंत देतात. जिजाबाई पहिल्या पुत्राच्यावेळी अजाण होती. पण शिवरायांच्या जन्मापर्यंत ( शिवराय ७ वे पुत्र) भोवतालच्या घटनांच्या परिणामांनी प्रौढ प्रगल्भ झाली होती.

या काव्यात गद्यनिवेदन कुठेही नाही. मात्र पद्यातून घटनांची संगतवार छाननी केली आहे. भावात्मकतेबरोबरच ऐतिहासिक सत्यही जपले आहे. यातील व्यक्तिचित्रेही जिवंत आहेत. एवढे मोठे महाकाव्य लिहायचे म्हणून कारागिराचा भाग फारसा कुठे आलेला दिसत नाही. कवीच्या आत्मनिष्ठेचा तो भाग असेल.

### जानपद कविता

आधुनिक मराठी कवीतेत जानपद कविता प्रारंभी लिहीण्याचा पहिला प्रयत्न कवी भा. रा. तांबे यांचे 'गुराख्याचे गाणे' आणि चंद्रशेखरांच्या 'काय हो चमत्कार !' या कवनांत दिसतो. यांच्यानंतर जानपद जीवन जानपद भाषेतच चित्रित करण्याचा पहिला मान गिरीश आणि यशवंत यांच्याकडे जातो. यशवंतांची जानपद कविता १९२३ च्या सुमारास लिहीलेली आहे.

जानपद कविता लिहीणाऱ्या कवींवर ''त्यांनी भावजीवनाची किंवा तेथील निसर्गाची भेट थेटपणे न घेता काव्यरचना केली'' असा आरोप केला जातो. पण या एकूण कवितेबाबत म्हणायचे झाले तर या कवितेत काही दोष असले तरी या कवितेने कवितेला एक नवीन विषय मिळवून दिला आहे. साहित्याचे क्षेत्र विस्तृत करण्याचा प्रयत्न केला आहे आणि यशवंतांच्या बाबतीत हा आरोप खोटा ठरणारा आहे. केवळ नाविन्याची हौस म्हणून त्यांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण आपल्या कवितेत केले नाही. त्यात स्वानुभवाचा आणि निष्ठेचा भाग बराचसा आहे. त्यांचे बालपण खेड्यात गेले. ग्रामसंस्कृतीचा त्यांना जवळून परिचय होता. पण तत्कालिन कवितेची काही सांकेतिक बंधने त्यांच्यावर पडली असतील आणि म्हणून काही दोष निर्माण झाले असतील. प्रेमाची दौलत, न्याहारीचे गाणे, घर या त्यांच्या प्रारंभीच्या काळातल्या कविता (अनुक्रमे २३, २५, २९ या कालखंडातल्या) या अस्सल ग्रामीण वाटतात. इतर कवितांच्या बाबतीत नागरजाणीवेचा, भाषेचा स्पर्श आहे.

''न्याहारीचे गाणे'' ही त्यांची पहिली जानपद कविता त्याकाळी खूप लोकप्रिय झाली होती. या कवितेत - ''कुणबाऊ भाषेची योजना, उचित अभिनव व चटकदार आहे यात शंका नाही. (५) 'न्याहारीचे गाणे' कोल्हापूरच्या एका गावंढळाने गुणगुणलेले ऐकल्यामुळे स्वयंसेवक नाटकात मामा वरेरकरांनी पूर्वीचे पद काढून या रांगडी पदाची योजना केली (६)हे गाणे रजतपटावरही चित्रित झाले होते. खरे तर 'प्रेमाची दौलत'' ही यशवंतांची पहिली जानपद कविता पण न्याहारीचे गाणे या गीताला जे यश मिळाले ते 'प्रेमाची दौलत' ला मिळाले नाही. या कवितेच्या यशस्वीतेचे आणखी एक चिन्ह हे की त्या टुमीचे ताबडतोब अनुकरण होऊ लागले. (७) परंतु या भावगीताचे रहस्य या टुमीत नाही.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

'न्याहारीचे गाणे' मधल्या नायिकेला नांगरावर गेलेल्या घरधन्याची भाकरी घेऊन जाण्याची घाई झालेली आहे.

''न्यारीचा वकुत व्होईल मैतरणी बिगीबिगी चाल

नांगूर सुटीच्या आत पोचाय होवं ततं''

कारण नांगर सुटी झाल्यावर त्याची नजर तिला धुंडेल याची खात्री म्हणण्यापेक्षा ओढ तिला आहे. त्याचाही घामानं भिजलेला चेहरा पहाण्याची तिला ओढ लागली आहे. म्हणून ती लगबगीनं चालली आहे. कवितेचा गाभा प्रेम असला तरी कवितेतली स्त्री ग्रामीण आहे हे विशेष. यशवंतांनी एक निर्व्याज रोमँटिक चित्र ग्रामीण तपशीलाच्या सहाय्याने रेखाटले आहे. यशवंतांच्या या काव्यावरून ग्रामीण जीवनातल्या कारुण्याला त्यांनी वास्तव पार्श्वभूमीवर सुकर करण्याचा प्रयत्न केला आहे. ती अभिव्यक्ती प्रभावी नसली तरी प्रयत्न स्तुत्य होता म्हणून त्याला जानपद कविता म्हणावे लागेल. (८) या कवितेचा उद्देश सफल झाला आहे. नायिकेची पतीमुख पहाण्याची उत्कंठा आपल्याला पटते. पण 'न्याहारीचे गाणे' हा मथळाच चुकीचा आहे. वर्ण्यविषय 'न्याहारी' नसून नायिकेची 'लगबग' हा आहे. तेव्हा मैतरणी बिगीबिगी चाल. हाच मथळा दिला असता तर ते योग्य झाले असते. असे माधव ज्युलियन यांना वाटते. पण नवऱ्याची न्याहारी घेऊन जाताना बायकोच्या मनात हाच भाव जागृत असावा. तेव्हा न्याहारी घेऊन जातानाचेच हे गाणे म्हणून ''न्याहारीचे गाणे' हे नावही योग्य वाटते. न्याहारीच्या कार्यक्रमाचे वर्णन असणारे न्याहारीचे गाणे होऊ शकते असे माधव ज्युलियन यांना वाटत असावे ते खरेही आहे.

पण न्यारी (न्याहारी) हे दुपारचे खाणे नव्हे तर सकाळचे अनशेपोटी खाणे होय. हाही दोष यशवंतांनी निर्माण केला आहे. 'न्यारी' हा शब्द ग्रामीण वाटावा म्हणून घेतला असेल आणि कवितेत शेतकऱ्याच्या भुकेची सोय गैरसोय हाही प्रश्न नायिकेच्या मनात निर्माण व्हायला पाहिजे होता. पण तसे काही झालेले नाही. नायिकेने त्याच्या भुकेची काळजी दाखवायला पाहिजे होती. पण त्याला भेटण्याची ओढच जास्त दाखविली आहे. असे काही दोष निर्माण झाले आहेत. विषयाच्या नाविन्यानेच केवळ हे गीत लोकप्रिय झाले असावे.

नांगरावर भाकरी घेऊन जाणारी स्त्री जेव्हा सायंकाळी शेतातून परत येणाऱ्या नवऱ्याची वाट बघत असते तेव्हाचे तिचे चित्रण 'झाल्या तिन्हीसांजा'मध्ये बघायला मिळते. कवितेचे निवेदन ग्रामीण भाषेत आहे. तरीही रुंजी, अष्टभुजा सारखे अस्सल नागरी शब्द यमक जोडण्यासाठी येतातच. 'प्रेमाची दौलत'' मधील भावसौंदर्य हृदयाला हात घालते. एक विधवा स्त्री आपल्या गेलेल्या नवऱ्याच्या वस्तु घेऊन कुरवाळत बसते. हे तिचे वेड पाहून इतर लोक तिच्याकडे पाहून हसोत तिला त्याची पर्वा नाही. तिला एकच ध्यास आहे. त्याची वाकळ, त्याचं मुंडासं, मोरवेलीची काठी हे सारं ती जपून ठेवणार आहे. तिच्यापोटी त्याचा अंश वाढतो आहे.

''माझिया कोण जो पोटी । येईल

तो जवा बापई म्होरं । होईल

ह्ये घालून त्याला पाहीन डोळे भरूनी

मग खुशाल तिरडी बान्धा माझी कोणी.''

नवरा हयात नाही तरीही तिचे त्याच्यावर प्रेम किती निस्सीम आहे हे दिसते. स्वतःच्या नवऱ्याचाच पुर्नजन्म ती मुलाच्या रूपात पहाणार आहे. ती आशावादी आहे. दुर्दैवाचा घाला पडला तरी ती ती उन्मलून पडलेली नाही. तिच्या कणखरपणाचे दर्शन यातून घडते.

''ऐनवेळी'' हेही जानपद प्रेमगीतच आहे. यातील नायिका नायकाची विनवणी करीत आहे.

''दाताच्या करूनी कण्या विनवु मी राया किती रे तुला

नाही मागत राजसा मज तुझी ती शेज किंवा उशी

पोतेरे बनुनी घरात तुझिया रहावया मी खुशी''

मला दूर लोटू नकोस ती गायी राखणारी गुराखी पोर आहे. तिला जेव्हा घराकडे गायी वळवता आल्या आल्या नाहीत तेव्हा यानेच तिला मदत केली. त्याने तिला झाडावर चढविले आणि डहाळीवर बसून झोके घेतले. तिला झाडावरून खाली उतरताना झेलूनही घेतले. पण आता कायमचीच झेल म्हणताना कसा बाजूला होतोस? माझ्या गायी वळविल्यास पण मीच गाय होऊन आले असता मला परत रानात का हाकलून देतोस. दुपारची तुला झोप येताच मी तुझे डोके मांडीवर घेतले. तोंड कुरवाळले. इतके सारे करायला तुझी परवानगी होती. मग माझा स्विकार का करीत नाहीस? ''ऐनवेळी'' या शिर्षकातून वेगळाच गर्भितार्थ सूचित होतो. ती धोक्यात आली आहे. आणि तो तिला साह्य करण्यास तयार नाही. जबाबदारी टाळण्यात नायकाचा भेकडपणा दिसतो.

पण वेगळा नायकही कविने 'तूच रमणी' या कवितेत रेखाटला आहे. कवितेची भाषा जरी प्रमाण भाषा असली तरी आशय जानपद जीवनातलाच आहे. विशाल भाळ, धनुष्याकृती भुवया, चाफेकळी नाक, कुंदकळ्यांसारखे दात, नाजुक जिवणी आणि सोनचाफ्यासारखी कांती हे सौंदर्यविशेष शेतात शेतकाम करणाऱ्या नायिकेत कुठून असणार? म्हणून 'तूच रमणी' या कवितेत नायिका कुरुप असूनही तिचा नवरा तिच्यावर प्रेमच करतो. कारण तिच्यात सौंदर्याचा अभाव असला तरी तो का आहे याची त्याला पूर्ण कल्पना आहे.

''उन्हातान्हामाजी अविरत जिने कष्ट करणे

तिच्या गाली पद्मासम कुठून लाली बहरणे

तिच्या डोळ्याभोवतालची काळी वलये कशी, केव्हा, कोठून आली याची कारणे त्याला ज्ञात आहेत. म्हणूनच त्याची निष्ठा ढळत नाही. कारण त्याला पुरते माहिति आहे की - ''बगीच्यापेक्षा ती जमीन बरवी बावनकशी''. केवळ कल्पनाविलासात रमण्याची वृत्ती यशवंतांची नाही. व्यवहाराच्या खडबडत जमिनीवरून चालत जाणारे ते एक रसिक प्रापंचिक आहेत. ''तूच रमणी''

या कवितेत यशवंतांनी आपल्या गृहीणीचे जे शब्दचित्र रेखाटले आहे तेच बहुतेक सर्व वाचकवर्गास पटण्याइतके खरेखरे आहे. (९)

''गृहीणी मीः नच देवी'' ही कविताही जानपद नाही. असे म्हणता येईल. पण त्यातील आशय मात्र जानपद जीवनातील कृषीसंस्कृतीला अधिष्ठान प्राप्त करून देणारा आहे. ही कविता तात्कालिन येऊ घातलेल्या स्त्रीपुरुष समानतेच्या तत्त्वावर आधारलेली आहे. कवितेची नायिका शहरी स्त्री आहे. तिला जपणूक नको आहे. कृषीसंस्कृतीतल्या स्त्रीचा समानतेचा अधिकार हवा आहे. कारण आमची ग्रामीण शेतकरी स्त्री पुरषाच्या बरोबरीने शेतात राबत होती. पुरुष करू शकणारी बरीचशी कामे ती करू शकत होती. ती आत्मनिर्भर होती, दुर्बल नव्हती. स्त्रीत्त्वाच्या मर्यादा तिलाही होत्या. पण नागर स्त्रीप्रमाणे ती केवळ 'फेअर सेक्स' नव्हती. या ग्रामीण स्त्रीला समानतेचा हक्क जो काही होता तो या नागर स्त्रीलाही भावतो आणि म्हणून तिला शेतकऱ्याची बायको होण्याची हौस आहे. ती म्हणते -

''थापिन मी भाकरीही चालवीन आणि विळा

वाहिन शिरी घागरीही तेवि मोट बा शिवला''

कारण -

'घरकुलास दोघांच्या कष्टांच्या फुलमाळा

बांधाया येतील तोच खरा सोहळा''

नागरी मनाचे ग्रामीण जीवनाबद्दलचे आकर्षण यातून स्पष्ट होते.

कृषीसंस्कृतीचे महत्त्व, शेतकऱ्याचे दुःख व्यक्त करणाऱ्या काही कविता नागरी भाषेच्या निवेदनातून केल्या आहेत. 'नांगरखुण्टी सोन्याची। बैल - पेरून मोत्याची ॥'' मध्ये शेतकऱ्याच्या दैन्यावस्थेचे चित्रण आले आहे. शेतकरी एवढे राबतो पण सोन्याची खुंटी कधी त्याने आपल्या नांगरास लावली आहे की बैलांना मोत्याची वेसण कच्ची घातली आहे. पण हे सारे तो (शेतकरी) आपल्या गीतातून म्हणत असतो. खरोखरच असे वैभव कधी काळी होते? नसेलच याची खात्री आम्हाला आहे. कारण आज आम्ही पहातो ते शेतकरी अर्ध्याच पोटी जगतात. त्यांना चांगले कपडे मिळत नाहीत. कर्जाच्या ओझ्याखाली तो दबलेला असतो. व्याज फेडायला बैलही विकावे लागतात. आणि मग पोटाच्या सोईसाठी मुंबईचा रस्ता धरतो हे मरणासच आमंत्रण असते. कामाचे स्वरूप आणि उपासमारीने तो लवकरच मरतो. ''नागखुंटी सोन्याची। बैल- वेसण मोत्याची'' या गीतातले वैभव पुन्हा पहायला मिळावे असे कवी म्हणतो. शेतीत दैन्य आहे असेही कवी म्हणतो. आणि ''शेतकीतील सुख'' ही कवी वर्णन करतो. शेतीत निसर्गाचे सान्निध्य लाभते. तोआनंद वेगळाच असतो. मृदू तृणांची मखमाली गादी असते. शिवारात पिके दाटलेली असतात. पक्ष्यांचे आवाज ऐकायला मिळतात. अशा पार्श्वभूमीवर

''भूक लागतां चटणी किंवा कांदा अन् भाकर

खाऊनी द्यावी वर ढेकर

घुमाळ - बाला जोडी घेऊनि मोट धरावी कधी

करावी राखण मळणी कधी

रास घालुनी डोळे भरूनी सन्तोषे पाहुनी

निजावे वाकळ मग पसरूनी.''

निजल्यावर वर चंद्रतारांकित आकाश आहे, संरक्षणासाठी पायथ्याला वाघ्या कुत्रा झोपलेला आहे. बैलाच्या गळ्यातील घुंगरांचा आवाज मध्येच येत आहे. एकूण हे सारे वैभवशाली आहे.

लाख पटींनी हे न सुखद का कृषिकर्मी राबणे

नको ते परवशतेचे जिणे

हे तर खरेच आहे. कष्ट करावे लागले तरी परवशतेचे लाजिरवाणे जिणे नाही. हिरे, मोती जवळ नसले तरी त्या तोलाचे किंबहुना त्यापेक्षा अधिक मोलाची धनसंपदा त्यांच्याकडे आहे. हा आशय ''घर'' या कवितेतून व्यक्त केला आहे. माणसाची मूलभूत गरज अन्न आहे. त्याशिवाय तो जगू शकत नाही. हिरे, माणके कितीही मौल्यवान असली तरी ते शेवटी खडेच. त्यात सृजनक्षमता नाही. पण पडवीची धान्य भरलेली कणगी, पोती, दावणीचे गायी बैल हेच हिरे, माणिक, मोती खऱ्या अर्थानं असतात. एकपरी हिरे माणकाशिवाय माणूस जगू शकेल पण अन्नाशिवाय जगू शकणार नाही आणि ते निर्माण करणारी जमीन तिची मशागत करणारे बैल हेही तितकेच मौल्यवान. शेतकऱ्याची हीच खरी दौलत. हिरे, माणके कितीही मौल्यवान असली तरी त्याच्या बदल्यात तो उदरनिर्वाहाच्या वस्तूच विकत घेईल. हिरे, माणकं असलेल्या घरात लेक पडावी अशी इच्छा एकजण व्यक्त करतो त्यावर हा शेतकरी उत्तर भरतो -

''पडवीला कणगी पोती मोती त्यामधी बिनमोल

दावणीस गायी बैल ते आम्हा हिरे अन् लाल

दरसाल

पिके येतात

खाण शेतात

तीच सोन्याची -''

शेतकऱ्याचे हे उत्तर ऐकून अर्थातच मुलीच्या बापालाही हे पटते आणि तो आपली मुलगी त्या घरात देतो. अत्यंत अल्प शब्दात भाव व्यक्त केला असल्यामुळे अतिशय परिणामकारकता या कवितेला आली आहे. गीताच्या चालीवरची पण शेतकऱ्याच्या जीवनातले सत्य अधिक उत्कटतेने कवीने 'घात' या कवितेत व्यक्त केले आहे. पावसाने जमीन भिजते. पेरणीसाठी ती ओलसर पण भुसभुशीत व्हावी लागते. तरच पेरणी करता येते. पाऊस कधी येऊन घोटाळा करील याची खात्री नसते. म्हणून पावसाची उघडीप झाली आणि पेरणीस योग्य अशी जमीन झाली की शेतकरी पेरणीस सुरवात करतो. त्यावेळी त्याची भयंकर गडबड चाललेली असते. कारण साऱ्या वर्षाचे भविष्य या पेरणीवरच अवलंबून असते. एकदा पाऊस सुरू झाला की पेरणी अशक्यच असते म्हणूनच

''घरी झाका मडं

पुरं करा रडं

७ उद्या बघू किर्याकर्म सारं''

असे म्हणण्याइतकी ही पेरणी महत्त्वाची असते. त्याहूनही महत्त्वाची घात शेतकऱ्याला अजिबात उसंत नसते. कारण एकदा ही घात गेली की

''तरि कराच घात

रडत्याल पोरं गुरं - ढोरं''

शेतकऱ्याच्या जीवनातील विविध पैलूंचं दर्शन यशवंतांच्या जानपद कवितेतून दिसते. केवळ शृंगाराचे मोकळ्या अंगाने चित्रण करण्यासाठी त्यांनी जानपद कवितेचा आधार घेतला नाही की शेतकऱ्याबद्दल सहानुभूती निर्माण व्हावी म्हणूनही लिहीली नाही. त्यांच्या अशा कवितेमागील प्रेरणा त्यांनी खेड्यात घालविलेले पूर्वायुष्य, ग्रामीण जीवनाचा जवळून परिचय, त्यांच्या सुखदुःखाशी एकरूपता हीच असावीत असे वाटते. तत्कालिन रूढ संकेतांना बळी पडल्याने काही दोष उत्पन्न झाले असतील. उदा. 'न्यारीचे गाणे' मधील दोष.

या जानपद कवितेत काही दोष असले, त्रूटी जाणवल्या तरी विषयाचे नाविन्य हे वैशिष्ट्य होते. जानपद गीतांचा प्रकार मराठी काव्यात रूढ करण्याचे श्रेय काही अंशी रविकिरण मंडळाला द्यावे लागते. यात प्रामुख्याने कवी यशवंत आणि गिरीश यांचा वाटा महत्त्वाचा आहे. कुणबाऊ भाषा योजून ग्रामगीते लोकप्रसिद्ध करण्याचे श्रेय यशवंतांकडे जाते. या अगोदर ग्रामीण जीवन साहित्यात येत नव्हते. एकूण साहित्यच 'सदाशिव पेठी' होते. ग्रामीण जीवन हे साहित्याच्या दृष्टीने उपेक्षितच होते. जानपद कवितेच्या निर्मितीच्या मागे गांधीवाद, इंग्रजीतील पॅस्टोरल पोएट्री'च्या वाचनाचा परिणाम, सभ्यता, बंधुता ही तत्त्वे व तत्कालिन कवींची काव्य लोकप्रिय करण्यासाठी कवितेत नाविन्य आणण्याची हौस अथवा धडपड ही कारणे असू शकतील. पण ग्रामीण जीवनाला कवितेत आणि एकूण साहित्यातही. - याच कालखंडात स्थान मिळू लागले.

**कौटुंबिक कविता -**

'केशवसुतां'सारखी तात्त्विक कविता यशवंत लिहू शकले नाहीत. तरी ''गोष्टी घराकडील मी वदता गड्या रे'' या रसाळ कवितेपेक्षाही अधिक भावगर्भ व अधिक सुंदर अशा कौटुंबिक कविता त्यांच्या लेखणीतून लीलेने अवतरल्या आहेत. त्यांच्याइतकी विविध विपुल व सरस कौटुंबिक कवने दुसऱ्या कुणाही कवीने लिहीलेली नाहीत. (१०) त्यांचा पिंड कनिष्ठ मध्यम वर्गाच्या १९२० पूर्वीच्या जीवनमूल्यांनी संपूर्णतः संस्कारित झालेला आहे. त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमीही यापाठीमागे आहे. यशवंतांचे वडील प्राथमिक शिक्षक होते. त्याकाळी शिक्षकाजवळ पैशाच्या धनाऐवजी विचारांचेच धन अधिक असे. ऐहिक सुखोपभोगापेक्षा सुसंस्कारांचा वारसा मुलांना मिळे. सुख काही फक्त पैशाने विकत घेता येत नाही. मनाच्या चांगुलपणावर ते बरेचसे अवलंबून असते. नाहीतरी जीवनातली बरीचशी दुःखे मानवी दुर्गुणांमुळेच निर्माण होतात. एकमेकांविषयी प्रेम असेल तर सुखाची कधी वाण पडत नाही. अत्यंत प्रेमळ असे आई-वडील लाभले होते. स्वतः उपाशी राहून मुलांना खाऊ घालणारे, सणावारीही शिळेपाके खाऊन स्वतः जुनेपाने कपडे घालून मुलांना गोडधोड खाऊ घालणारे, स्वतः त्रास सोसूनही मुलांना सुखात ठेवण्यासाठी धडपडणारे आई-वडील त्यांना लाभले होते. स्वतः मोठे झाल्यावरही अगोदर लहान भावंडाची व नंतर मुलांची जबाबदारी त्यांच्यावर पडली व त्यांनी ती आर्थिक ओढगस्तीतूनही सुरळीतपणे पार पाडली. त्यांचे मन फार संवेदनशील होते, हळवे होते, उदार होते, सत्यं शिवाची उपासना करणारे होते. त्यांची कौटुंबिक कविता हा त्यांच्या कुटुंबवत्सल स्वभावाचा परिपाक आहे. माता-पुत्र, पिता-पुत्र, पती-पत्नी यांच्यातील प्रेमाचे धागे यात आहेत. त्यात भ्रातृवियोगाच्या दुःखाने दुःखीत झालेला पोरका मुलगा आहे. तसा आपल्या चिमण्या पिल्लांसाठी सोसाव्या लागणाऱ्या कष्टांमुळे आईबापांनी आपल्यासाठी किती कष्ट सोसले असतील या जाणीवेने सद्‌गतीत होणारा अंतर्मूख पिताही आहे. आई होण्याचे सुख लाभत नाही म्हणून दुःख करणारी वंध्या, मुलाला इजा होऊ नये म्हणून जपणारी, त्याच्या खोड्यांनी कातवणारी अशी माता आहे. स्वतःच्या दुर्दैवाचा शाप मुलाला लागू नये म्हणून मुलाला आशिर्वाद देण्यासाठीही हात न उचलणारा पिता आहे. पतीला आवडणारे रायते मुद्दाम राखून ठेवून त्याची गरीब, प्रेमळ गृहीणी जशी त्यांच्या कवनात दिसते तशी पतीच्या लोकप्रियतेमुळे व सार्वजनिक कार्यामुळे त्यांच्याशी घटकाभर बोलायलासुद्धा मिळत नाही म्हणून कुरकुर करणारी प्रियतमाही आहे. त्यांच्या कौटुंबिक कवितांतून विविध विषय गोचर होतात पण हे सर्व कौटुंबिकच आहेत. यातील व्यक्ती कुटुंबसंस्थेशी कुठल्या ना कुठल्या नात्याने बांधलेल्या आहेत. मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे तर कौटुंबिकही आहे. घर, नातीगोती ही त्यांच्या संदर्भात अपरिहार्यच असतात. त्याला समाजजीवन जसे असते तसे कुटुंब जीवनही असते. या दृष्टीने यशवंतांची कौटुंबिक कवीता लक्षात घेणे गरजेचे आहे.

मुले म्हणजे देवाघरची फुले. ती अजाण, निष्पाप असतात. त्यांच्या खोड्यांनी मोठ्यांना त्रास होत असला तरी जाणून बुजुन ती तसे करीत नसतात. चांगले वाईट यातील फरक त्यांना कळत नाही. प्रौढांच्या मनातील विचार किल्मीषे त्यांचा मागमूस त्यांच्यात नसतो. म्हणूनच कवीला लहान बालकांचे ओठ म्हणजे 'मोक्षाची दारे' वाटतात. आणि म्हणूनच धन, दौलत, रूबाब, सौष्ठव व आरोग्य नसतानाही केवळ अपत्यप्रेमामुळेच मृत्यूला सबूर (जरा थांब) असे म्हणावेसे वाटते.

मुले कशीही असली तरी ती आईवडीलांना प्रियच असतात. मूल जोवर जागे असते तोवर आपल्या खोड्यांनी आईला भंडावून सोडते. त्यामुळे आईला त्याचा भयानक संताप येत असतो. ती त्याच्या उपद्व्यापाने त्रासून जात असते. पण जेव्हा तो झोपलेला असतो तेव्हा कौतुकाने आणि ममतेने तिचे मन भरून येते.

सारे जग स्वार्थाने बरबटलेले आहे. सर्वत्र निराशाच पदरी पडते. जगाला भिऊन, त्रासून, विटून कवी घरी परततो तेव्हा आपल्या लहान मुलीच्या बोबड्या बोलात रमतो. तिथे त्याला खऱ्या सुखाची प्राप्ती होते. कारण त्या लहान मुलीची -

''प्रिती निरपेक्षा, भावना निष्पापहि सत्या

निस्वार्थी मन हे तयाच्या तशाचही भराऱ्या''

त्यामुळे कवीला -

''शैशव असले हे मनोहर बगीचाच भासे.

त्यात विहरताना कुणाचे मानस नच हसे ?''

(चिमुकल्या करापाशी - यशोगंध)

लहान मुलांचं प्रेमही निस्वार्थ असतं. काही दिलं नाही किंवा काही घेण्याची अपेक्षा नाही तरी हे लहान मुल मिठी मारते. हसते आहे. कवी त्याच्या दृष्टीआड झाला की हिरमुसले होत आहे त्यामुळेच त्या मुलाचे हसणे म्हणजे ब्रह्मांडसुखाची पेठच फुलल्यासारखे कवीला वाटते.

(गुलामा ! ओळख ही कुठली ?- यशोगंध)

कवी कधी उदासवाणा झाला तरी लहान मुलीच्या लपंडावाच्या खेळाने फुलून जातो - (सुधेस - यशोधन)

लहान मुलांची मने फुलासारखी नाजूक असतात. ती म्हणजे कोवळ्या कळ्याच असतात. पण पन्तोजीच्या कठोरपणामुळे त्या कुस्करल्या जातात. म्हणून कवी पन्तोजींना झुलझुलत्या वायूची कला शिकून घे. तरच ह्या कोवळ्या कळ्या तुझ्यापुढे उमलतील. त्यांना हळूवारपणे हाताळले पाहिजे. फुलांची माला गुंफण्याचे काम तुझ्याकडे आले आहे. पण तुला या मृदू अंकुरांचे संगोपन करता येत नाही. तुझ्याकडून ते कुस्करले जाताहेत. पण तू तरी जिथे साखर पेरेल तिथे जहराची योजना कशाला करतेस?

''पन्तोजीने छडी धरावी पुष्पपरागांची''

(पन्तोजींची छडी - यशोधन)

पन्तोजीने मुलांना मारू नये पण त्यांच्या खोड्याच अशा असतात की, आईही त्याला मारते. तेव्हा मूल आईची विनवणी करते.

''मालूं नको ग मी केलं काय पाप तली ग !''

ते रडू लागते. त्याचा तो ग्लान झालेला चेहरा पाहून मातेचे हृदय द्रवल्यावाचून कसे राहील? तिचेहृदय विरघळते. हातातली छडी गळून पडते. आणि त्याला चटकन उचलून घेते. स्वतःची खरंच चूक झाली या जाणीवेने तिला रडू येते. तिला रडे आलेले बघून बालक म्हणते - तुला कुणी मारलं ? हे बघून आईच्या प्रेमाला जास्तच भरतं येते. आई मुलातील प्रेमाचा सुंदर नमूना या कवितेद्वारे रसिकांसमोर कवीने उभा केला आहे.

हे झाले अगदी लहान मुलाचे. आईबद्दलचे प्रेम पण मूल मोठे झाल्यावर त्याचे उपद्व्याप वाढू लागतात. आई त्याच्यावर रागावते. त्याच्या मनात आईबद्दल प्रेम आहे. पण सतत भितीही वाटते. -

''क्रिडा सरला आता पोरकट

देहा लागला व्हाया राकट

पराक्रमास्तव करति खटपट

का कपाळावर अठी तरी.''

आईच्या मनाप्रमाणे मुलाने वागले पाहिजे अशी अपेक्षा असते. म्हणूनच

'तुझ्या रूचीची सीती सरता

धारण की करशील ऋद्धता

वात्सल्याचा कुवा तव रिता

होईल अचानक काय तरी? (मातेस - पाणपोई)

म्हणून भिती वाटते. पण लहानपणी जशी मला जवळ घेऊन कुरवाळीत होतीस तसे कुरवाळावे माझ्या कपाळावरचा घाम पुसावास असे अजूनही वाटते.

आईविना मूल आणि मूलाविना आई हे दोन्ही करूणेचे विषय. मुलाला आई कितीजरी रागावली तरी त्याच्याशिवाय ती जगू शकत नाही. 'मातृपदाविना' कवितेत मूल नसलेल्या स्त्रीची व्यथा मांडली आहे. मूल नसल्याने तिचे जिवीत विफल वाटते. इतर सुखसाधने भरपूर असूनही ती दुःखी आहे. निसर्गातील वात्सल्यतेची दृश्ये तिला हैराण करतात.

''ही चिमणी चारा आणून घाली जिला

ही पहा वानरी फिरते घेऊन मुला

निज कटि खान्दी ही लतिका मिरवी फुला'' (मातृपदाविन = पाणपोई)

यांनाही हे सुख मिळते आहे. मलाच नाही. माझा हा स्त्रीपणा निष्फळ वाटतो आहे. मातृपदाविन स्वर्गसौख्यही उणेच आहे.

'मातृपदाविण' मध्ये मूल नसलेल्या स्त्रीच्या वेदनेचा सूर आहे. तर ''आई'' कवितेत पोरक्या मुलाचा मातृशोक आहे. पण तो केवळ एका पोरक्या मुलाचा शोक रहात नाही. मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र बनते. १९१८ च्या दसऱ्याच्या नवरात्रात यशवंतांची आई निधन पावली. यशवंत त्यांच्या भावंडात सगळ्यात थोरले आणि जाणते. आप्पा, भास्कर, आई आणि काशिताई ही त्यांच्यापेक्षा लहान भावंडे. तीही मातृसुखाला आचवली. ही घटना 'आई' कवितेच्या मागे आहे. पण आई कविता मातृनिधनानंतर लगेच लिहीली गेली नाही. ती लिहीली गेली १९२२ मध्ये. १९२२ च्या बडोद्याच्या साहित्य संमेलनामध्ये त्यांनी 'देहावाचून' कविता वाचून दाखविली. आणि त्यांचे तेथे खूप कौतुक झाले. ही घटना ही कविता स्फुरायला कारणीभूत झाली असावी. कारण ''गुंफून पूर्वजांच्या मी गाईले गुणाला... परि जीव बालकाचा तव कौतुका भुकेला !'' हे त्या कवितेतलं उपांत्य कडवं प्रथम सुचलं. असं यशवंत सांगतात. (११)

आई ही जातिवंत भावकविता आहे. मातृवियोगाच्या दुःखाने दुःखित झालेला हा हळवा मुलगा आहे. त्याच्या दृष्टीला सर्वत्र मातृप्रेमाची दृष्ये दिसतात. त्यामुळे त्यांचे दुःख दुणावते. चिमणी आपल्या पिलांच्या मुखी चारा देते. गोठ्यात वासरांना गाई चाटतात. ही दृश्ये त्याला व्याकुळ करतात. त्याला आईची अधिकच आठवण येते. आपल्या रोजच्या आयुष्यात आईने आनंद कसा ओतला असता याचे स्मरण होऊन तो म्हणतो

''शाळेतुनि घराला     येता धरील पोटी
काढून ठेवियेला     घालील घास ओठी
उपट्या तशा मुखाच्या     धावेल चुम्बना ती
कोणी तुझ्याविना गे     का ह्या करील गोष्टी''

या मातृहीन बालकाला एक बहिण आहे. ती त्याच्याहून लहान आहे. अजाणपणामुळे तिला आईच्या वियोगाचे दुःख जाणवत नाही. त्यामुळे तर या बालकाला अधिकच भडभडून येते.

या कवितेतील उद्गार काही लहान मुलाच्या तोंडचे आहेत. जर काही प्रौढाच्या, पण भावसाकल्पाने मात्र मातृवियोगाचेच दुःख आहे. त्यामुळे रसहानी होत नाही. यशवंतांनी आपला सारा आत्माच या कवितेत ओतलेला दिसतो. त्यांच्या काव्याचा सर्वत्र जयजयकार झाला. पण ते कौतुक पहायला आपली आई नाही ही खंत जीवाला जाळीत होती. म्हणून ते म्हणतात

"पंचारती जनांची	ना तोषवी मनाला

परि जीव बालकाचा	तव कौतुका भुकेला"

वर या कवितेला मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र असे म्हटले. या स्तोत्राचा गाभा असा -

"आई ! तुझ्याच ठाई	सामर्थ्य नंदिनीचे

माहेर मंगलाचे	अद्वैत तापसांचे

गांभीर्य सागराचे	औदार्य या धरेचे

नेत्रांत तेज नाचे	त्या शान्त चन्द्रिकेचे

वात्सल्य गाढ पोटी	त्या मेघमंडळाचे

वास्तव्य या गुणांचे	आई, तुझ्यात साचे."

आईचा गौरव यापेक्षा अधिक चांगल्या शब्दात कुणी केला असेल ? या काव्यातील शेवटचे कडवे म्हणजे करूण रसाचा उच्च बिंदूच होय.

"येशील तू घराला	परतून केधवा गे

दवडू नको घडीला	ये ये निघून वेगे

हे गुन्तले जिवीचे	पायी तुझ्याच धागे

कर्तव्य माऊलीचे	करण्यास येई वेगे

ये रागवावयाही	जरि येइ येई वेगे (आई - यशोधन)

या "आई" कवितेचे बोल साधे, सरळ, सोपे पण अंतःकरण कापीत जाणारे आहेत. ही आस्वाद प्रतिक्रिया अर्थपूर्ण वाटते.

यशवंतांना अमाप प्रसिद्धी मिळवून दिली ती त्यांच्या "आई" या कवितेनेच. कवी यशवंत म्हणजे "आई" असे समीकरण निर्माण झाले. आजही ते कायम आहे. या कवितेतील 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' या ओळीला सुभाषिताचे रूप प्राप्त झाले आहे. काव्यगायनाच्या वेळीही ही कविता पुनःपुन्हा म्हणण्याचा आग्रह होई. ही कविता ऐकून हेलावून गेलेला सहृदय विरळाच. "आई ही कविता ऐकत असता वृद्ध मातापितरे जिवन्त असलेले गृहस्थ सद्गदीत झालेले व सात आठ वर्षांची मुले हुन्दके देत आईस बिलगलेली कितींदा आम्ही पाहिली आहेत" असे म. गो. रानडे नमूद करतात. (१२) "शामची आई" या प्र. के.

अत्र्यांच्या राष्ट्रपती पारितोषिक विजेत्या चित्रपटात आई या कवितेचा भावगीत म्हणून अंतर्भाव केला आहे.

एकेकाळी कवी यशवंतांच्या 'आई' ह्या कवितेने मराठी काव्यसृष्टीत इतिहास घडविला आहे. वामन मल्हार जोशी यासारख्या प्रगल्भ विवेकवाद्याला शोकाकुल करण्याचे सामर्थ्य असलेली ही कविता काव्यप्रेमिकांच्या मनी, मुखी बसली होती. कवी यशवंत म्हणजे आई असे समीकरण झाले होते असे उद्गार प्रसिद्ध समीक्षक व. दि. कुलकर्णी यांनी काढलेले आहेत. (१३) पण या कवितेबद्दल ग. हं. गायकवाड म्हणतात - ''आई'' या कवितेत एका छोट्या बालकाचे मातृवियोगाचे दुःख भडकपणे व काहीशा कृत्रिमपणे प्रकट झाले आहे. (१४) कारण त्यांना ''दैवते माय तात'' ही कविताच जास्त भावलेली दिसते. स्वतः मायतात झाल्यानंतरची वात्सल्याची भावना यात आहे. स्वतः मायबाप झाल्यावर आपल्यासाठी आईवडीलांनी किती कष्ट सोसले असतील याची जाणीव होते. प्रौढ मनाला जाणवणारे आईवडीलांचे महात्म्य हळूवारपणे विणले गेले आहे. स्वतः हाल सोसूनही आईवडील आपल्या मुलांचे संगोपन करतात.

शिळे पाके सेवून सणावारी

जुने -पाने लेवून घरीदारी

सदा पुरवावे गोडधड मुलांना

असे अवघड संसार यज्ञ जाणा. (दैवते मायतात - पाणपोई)

अशी जाणीव स्वतः आईवडील झाल्यावर होते. आणि आपल्या आईवडीलांनी आपल्यासाठी इतके कष्ट केले त्याची थोरवी कळते व ते दैवते वाटू लागतात.

प्राणीमात्रातही ही वात्सल्याची भावना असतेच म्हणून त्यांच्या कवितेत ''ही चिमणी चारा आणुनी घालिते पिला'' ही ओळ सतत येतै. (आई, मृत्यूला म्हणतो सबूर, मातृपदाविण)

'दैवते माय-तात' मध्येच व्यक्त झालेला आशयच, मुलांचे संगोपन नीट करता येत नाही म्हणून निराशा 'रंकाचे वैभव' आणि'शापीत नक्षत्रे' या कवितांतून व्यक्त झाली आहे.

मुलांच्या गरजा, छत्र पुरविण्याचे सामर्थ्य माझ्याकडे नाही. तरीही दुधाची तहान ताकावर याप्रमाणे मी त्यांची फसवणूक करतो.

'तरी वाटुन त्याचीही अपूर्वाई

रोज माझ्या हे बघति सौख्य - सोयी

मीच जणू की देवाधिदेव त्यांचा

नसुन अल्पही बडीवार पामराचा.''(रंकाचे वैभव - यशोगंध). मुलेही आपल्या वडीलांच्या कष्टाची कदर करतात. मात्र मुलांसाठी दीन अवस्थेमुळे फार काही करू शकत नसल्याने हे श्रेय फुकट आहे असे पित्याला वाटते. मुले ही जणू रत्ने आहेत. पण मी कंगाल आहे. रत्नांनी राजाच्या गळ्यात, मुगुटावर रुळायचे असते. पण ती माझ्या घरात धूळ खात पडली आहेत. त्यांची पदोपदी माझ्याकडून हेळसांड होते म्हणून

''शापित नक्षत्रे वाटते दयाळा

घातली जन्माला माझ्या गेही

काय गा तयांच्या वनवासासाठी

रंकाची खोपटी योजिली ही?'' (शापित नक्षत्रे - यशोगंध)

स्वतःच्या असामर्थ्याची जाणीव असल्याने स्वतःपेक्षा मुलांकडे जास्त लक्ष दिले जाते. स्वतःची हेळसांड फक्त मुलांपुरतीच केली जात नाही. आप्तेष्टांसाठीही केली जाते.

''संसारनौकेत जे सोबती हे तयांचीच आधी सुखे साधता नाही मला भान माझ्या सुखाचे पहायान संन्धीहि ते तत्वता'' आणि यात त्याला समाधानही लाभते. आईने मरताना त्याला सुखी राहण्याचा आशीर्वादवजा उपदेश दिलेला पण त्याचे उल्लंघन होत आहे म्हणून आईने रागावू नये अशी विनंती कवी करत आहे. (आज्ञाभंग - यशोगंध)

हे झाले माता-पिता आणि मूल यांच्यातल्या प्रेमभावाचे वात्सल्याचे दर्शन. हा वत्सलभाव फक्त स्वतःच्या मुलांपुरता नाही. मित्राच्या निधनाने पोरक्या झालेल्या इंदू या छोट्या बालीकेबद्दलचे कवीने 'इंदू कला' हे काव्य रचले आहे. हे काव्य १६ सुनीतांची माला आहे. काही उद्गार तिच्या मातेचे आहेत तर काही कविचे उद्गार आहेत. सर्वत्र करूण भावनेचा परिपोष झालेला आहे. तिच्या दुर्दैवाची जाणीव कवीला झाल्याने त्याचे अंतःकरण दुःखी झाले आहे.

यापेक्षाही कुटुंबजीवनातील वेगळे विषयही कवीने हाताळले आहेत. ते म्हणजे पतीपत्नीचे प्रेम. पतीभोवती सदा लोकांचा गराडा पडलेला असतो. त्यामुळे त्याची भेट घडत नाही. म्हणून कुरकूर करणारी स्त्री कुरकूर मध्ये आहे तर आपल्या नवऱ्याची वाट पहाणारी स्त्री ''प्रतिक्षा'' आणि ''झाल्या तिन्हीसांजा''मध्ये आहे. दूरदेशी रागावून गेलेल्या घरधन्यास एक अपत्यवत्सल स्त्री घरी येण्याची विनंती करणारी स्त्री 'घरधन्यास' कवितेत आहे.

यशवंतांच्या कौटुंबिक कवितेचा हा विशेष की इतरांपेक्षा कौटुंबिक कविता विपुल प्रमाणात लिहिल्या. विषयाची पुनरुत्पत्ती होऊन, एकाच विषयावर पुन्हा पुन्हा कविता लिहूनही या प्रकारची कविता शिळी ठरत नाही. यापाठीमागे त्यांची या विषयावरील

निष्ठा कारणीभूत असेल. पण यातील एक त्रूटी म्हणजे फक्त माता -पुत्र, पिता - पुत्र, पती - पत्नी यांच्यातील स्नेहाचेच धागे तो दाखवितो, इतर नाती उदा. भाऊ-बहिण या नात्याचा त्यांनी मागोवा घेतलेला दिसत नाही. ही त्यांची मर्यादा नसून त्यांचे वैशिष्ट्यच आहे. विषयाच्या मर्यादेमुळेच कदाचित त्यांची कविता परिणामकारक झाली आहे.

**यशवंतांच्या कवितेतील नैराश्य**

यशवंतांची कविता प्रामुख्याने निराशावादीपणाचाच सूर आळवताना दिसते. ''घरी नि दारी भरला घोर तिमिर सारा'' अशी स्थिती असल्यामुळे हा निराशावादीपणाचा सूर आला आहे. कधी ही निराशा बहुतांशी लोकांच्यामुळे तयार झालेली असते. यात कवी दैवाला दोष देतो. निराशा साहवत नाही म्हणून मृत्यूची आळवणी करतो. तशी ही सारी कविता आत्मनिष्ठ आहे. जीवन ही एक लढाईच असते. पण लढणार कुठवर ?

''मी कुठवर देऊ हात? कसे सावरू?
खिळखिळे कोसळे माझे घर टिकाव कुठवर धरू?
मी कुठवर लढवू कोट असा एकटा
खिण्डार पडे तिकडे इकडचे जरा लिम्पिता''
(कोंडमारा - यशोधन)

''त्यामुळेच कवी
'राबलो वृथा संसारसौख्यविभ्रमी
ते प्रभो आपल्या धामी''
(अखेरचे मागणे - यशोधन)

अशी देवाची आळवणी करतो. जीवनातील वाट्याला आलेल्या दुःखाला वैतागून, त्रासून मृत्यू हाच आपला जिवलग सखा आहे असे वाटते.

''जीवास सखा तूच खरा आश्रयदाता
की प्रेमळ माता
का घोळ असा घालिसी ये धाव मृत्यू
घाली न हुतूतू''
(मृत्यूस - यशोधन)

पण मृत्यू हाच जिवलग सखा आहे असे वाटूनही 'मरणा येऊ नको आताच' असेही कवी म्हणत आहे. कारण देवाने काही कामासाठी मला पृथ्वीवर पाठविले आहे ते माझ्या हातून होऊ द्या. हे देवाचे काम करत असताना यश पदरी पडत नाही. मी माझ्या परीने प्रयत्न करीत आहे. पण माझ्या आकांक्षा सफल कधी व्हायच्या कळेनासे झाले आहे.

''सफल कधी आकांक्षा व्हायच्या कळेना

करि उदण्ड प्रयास सुयश ते मिळेना''

म्हणूनही त्याला निराशा आली आहे. याला कारण दैव तर नसावे?

चित्रे रंगविली मनी समजुनी माझा चित्तारिच मीआहे दैवच चित्रकार कळले आता निराशा मनी''

(दैवच चित्रकार - यशोधन)

हे दोष कधी कधी सुखाचा पेला घेऊन येते तो मी ओठाशी नेऊन पिऊ लागतो पहिला घोट गोड लागतो पण नंतर मात्र कोयनेलाप्रमाणे कडूकडू होतो.

''सौख्याच्या चषकांतुनि मजकडे येतात दुःखे अशी

स्वीकारून सुखास अन्ति पडतो हा जीव ऐसा फशी''

(सुखाच्या पेल्यातून - यशोधन)

सुखाबरोबर येणारे दुःख नको. त्यापेक्षा निर्मळ दुःखच बरे. जीवनात दुःख आहे म्हणून कवी निराशा व्यक्त करीत असला तरी तो सुखासाठी हपापलेला नाही. उलट दुःख भोगण्याची त्याला एवढी सवय लागली आहे की कोणी दया दाखविली तरी -

'नका मारू मज दया दाखवून

माथां तीव्र ऊन सोसू द्या हो''

दुःखाची अपरिहार्यता कवीला पटली आहे. सुखापाठीमागून दुःख येणार हे ठरलेलेच.

'होई भरती जरि एकदा समाप्त

तरी ओहोटीही पुढे क्रमप्राप्त'

याची पुरेपुर जाणीव कवीला आहे. म्हणून तो प्रार्थना करतो आहे.

'सदा अपुरेपण असो सिद्धीमाजी

तेच ठेविल उत्साह शान्ति ताजी'' (यश:पथावर - यशोगंध)

त्यामुळे सोशिकताही वाढेल. दुःख स्विकारण्यातील स्वागतशीलता यात दिसते. प्राप्त परिस्थितीतच समाधान मानून घेण्याची वृत्ती आहे. मात्र असे चित्र सर्वच कवितांतून दिसत नाही. वर्तमान परिस्थिती बद्दलच्या तक्रारीच्या सुरांनीच सारी कविता भरून ठेवली आहे.

'घरी आणि दारी भरला घोर तिमिर सारा

एकही दिसेना कोठे व्योकपटी तारा''

त्यामुळे जीवन हा तुरुंगवास वाटावा यात नवल नाही. तर यापेक्षा या संसाराच्या तुरूंगातून सुटका करून घ्यावी असे वाटते.

''राबलो वृथा संसारसौख्याविभ्रमी

ते प्रभो आपुल्या ध्यानी, जाहलो सर्व या श्रमी''

(अखेरचे मागणे - यशोधन)

'होरपळे काया गुदमरे जीव

येईना का कीव मृत्यो ! माझी''

(आग - भावमंथन)

याला कारण जीवनातील विसंवाद कविला अस्वस्थ करतो. वंचनेच्या वाळवंटात जीव पोळून जातो. मोत्याची रास मिळावी अशी इच्छा असताना वाळूची रास मात्र प्रत्ययाला येते.

माझ्या अंगी दुबळेपण नाकर्तेपण आहे. आपत्तीविपत्तींनी घेरल्यामुळे असे झाले असावे. स्वतःच्या अंगी कर्तृत्त्व नाही याबद्दल काही कवितांतून खंत व्यक्त केली आहे. स्वतःला कमी लेखण्याची स्वतःकडे कमीपणा घेण्याची वृत्ती यात दिसते. स्वतः दुर्दैवी असल्याने आपला दुसऱ्यास अपशकुन होऊ नये म्हणून जपणारा एक पिता ''आशिर्वाद'' कवितेत आहे. आपल्या मुलास आशिर्वाद देण्यासही हा पिता धजत नाही. ''गाऊ कशाचे गान''मध्येही हीच भावना आहे. कोकीळेच्या स्वागतासाठी अवघा वसंत फुलला आहे. तिच्या गाण्यात तरूचे पानन् पान नाचविण्याची जादू आहे ती कवीकडे नाही कारण -

''मनोरथाची चाके चारी

परिस्थितीने गिळीली सारी

तशात घेईन लकेर मी जर

झाकळून हे जाईल अम्बर

दिशाही होतील निमिषी धूसर'' (गाऊ कशाचे गान - यशोधन)

मोहर गळून जाईल किंवा झाडाचे पान गळून जाईल. 'आशीर्वाद'मधील पित्यालाही हीच भिती ग्रासून राहिलेली आहे.

ही आतापर्यंत पाहिलेली निराशा का उत्पन्न झाली आहे. घरी नि दारी अंधार भरल्यामुळे आकांक्षा सफल न झाल्याने परिस्थितीने मनोरथाची चारी चाके गिळील्यामुळे अशी उत्तरे आत्तापर्यंत सापडली. पण हे सारे तरी कशामुळे झाले. याचे स्पष्टीकरण मात्र झाले नाही. घरी नि दारी अंधार भरल्यासारखे किंवा आकांक्षा सफल झाल्या नाहीत असे कवीला का वाटावे. याचे थोडेसे उत्तर जग रहाटी मध्ये सापडते. या जगाची सारी तऱ्हा उफराटी आहे. जिवंत असताना हे जग वंचना करते. मृत्यूनंतर मात्र कुडीतून प्राण गेल्यावर जेव्हा त्याला कसलीच संवेदना नसते त्यावेळी प्रेम उधाणू लागते. जिवंतपणी कुणी एक फुलही देणार नाही मग मृत्यूनंतर सर्व शव फुलांनी अच्छादतील. पूर्वायुष्यात - माझ्या पायात पाय घालून कितीदा पाडले पण आज मात्र खांद्यावर घेऊन सन्मानाने निघालेले आहेत. आप्तेष्टांनीही तोंड फिरविले पण आता कलेवराला मिठ्या द्यायला मात्र दाटी केली आहे.

''फुकटचा शब्द गोड

बोलला न कोणी धड

अर्पिली निंदा झोड

स्मशान हे निनादते आता स्मृती पाठी.'' (जगरहाटी - ओजस्विनी) जिवंतपणी कपाळावर खिळेठोक झाली. पण आता मात्र त्याच्या अस्थिवर नदीकाठी देवालये बसू लागली. ज्या घरात जिवंतपणी प्रवेश मिळाला नाही तेथे त्याच्या प्रतिमेची पूजा आता केली जाईल. जिवंतपणी सगळ्यांनी सतावले पण आता शीव ओलांडताच सगळेजण प्रेम दाखवायला लागले. जिवंतपणी नाही निदान मेल्यावर तरी आपल्याला प्रेम मिळेल अशी आशाही यातून व्यक्त होते. जगाच्या या उफराट्या तऱ्हेमुळेच कवी वारंवार निराश होतो आहे. मृत्यूनंतर लोक आपल्याशी कसे वागतील आणि जिवंतपणी कसे वागतात हे या कवीतेत दिसते. लोकांच्या वागण्याचे कवीच्या मनावर काय परिणाम होतात ते 'ग्रहांचा प्रभाव' कवितेत आहेत. लोकांचे निरनिराळे कटाक्ष कवीच्या मनात वेगवेगळी आंदोलने निर्माण करताता. कुणाच्या कौतुकाच्या नजरेने कवी उत्फुल्ल होतो.

तर - कुणाची भृकुटी पावता भंग

आवळले जाती पोटी पाठी तंग''

त्यामुळेच -

''जाहलो कुठे उत्फुल्ल, कुठे घायाळ

जाहलो कुठे संपूज्य, रक्तबंबाळ.'

(ग्रहांचा प्रभाव - ओजस्विनी)

ही निराशा जरी व्यक्तीगत जीवनातील कटु अनुभवांमुळे येते तशीच व्यापक पातळीवर समाजातील अवकळेनेही येते. समाजाचे बदललेले रूप, दुष्टप्रवृत्ती यामुळे ही निराशा येते. या धरतीवरती सर्वत्र क्षुद्रांचा कलकलाट आणि मूढांचा बुजबुजाट झाला आहे. पूर्वीचे शौर्य, पराक्रम राहिला नाही. स्वार्थ मात्र भरपूर वाढला आहे. सत्त्वधीरांचे वारस सध्या दिवसाढवळ्या दीन दुबळ्यांना लुबाडत असतात. (ही काय अवकळा - ओजस्विनी). समाजातील अनिष्टाच्या दर्शनाने त्यांना झालेले दुःख सामाजिक कवितांमधून व्यक्त झाले आहे.

यशवंतांच्या कवितात व्यक्त झालेली निराशा प्राधान्याने सामान्य माणसाच्या वाट्याला आलेली निराशा आहे. पण जनाची नाडी पाहू घालणाऱ्या महान नेत्यांची निराशा 'जावेच ना, घडेच ना' या पालुपदात 'युगंधराचे पालुपद' कवितेत येतात. लहान सहान गोष्टीच्या चुकीमुळे आणि स्वतःचा अहंकार जपण्यासाठी ही मोठी माणसे भिती लोकांच्या मृत्यूला कारणीभूत होतात ! चुकीच्या मुळापर्यंत जाऊन तिचे निवारण करण्याचे धाडस या नेत्यांत नाही. नवीन सुंदर शांत आणि निरामय अशी नव्या जगाची घडी वसावी म्हणून थोडे का प्रयत्न केले -

'सिन्धु आटले किति शाईचे

बोरू मेरू - मन्दारांचे

झिजले, गेले तासुन - चिन्दुन

फेसही आला ओठांवरती''

पण हवे ते साधता आलेच नाही. त्यांचे एकच पालुपद बनले

'जमेच ना, घडेच ना

बनेच ना, पटेच ना

(युगंधराचे पालुपद - पाणपोई)

यशवंतांच्या निराशावादी कवितेचे स्वरूप हे असे आहे. ''जीवनातील प्रतिकूल, कटु अनुभवांमुळे आणि कदाचित मूळ स्वभावामुळेच त्यांच्या भावनांना धार आलेली असे. आणि ती त्यांच्या भावगीतांना उत्कटता मिळवून देई. (१५) हे खरे वाटते. पण जीवनातील प्रतिकूल आणि कटु अनुभवांमुळे येणारी निराशा त्यांनी प्रातिनिधीक स्वरूपात मांडली आहे. ही सार्वत्रिकता प्राप्त

करून देण्याच्या ध्यासामुळे. कवितेत तोच तो आशय पुनःपुन्हा प्रकट होतो. जीवनात कटु अनुभव आले, घोर निराशा पदरी पडली. आणि त्यामुळे मृत्यूने लवकर यातून सुटका करावी अशा ठोकळ आशयाची ही कविता झाली आहे. या कटु अनुभवांचे विवेचन अथवा त्याची कारणमिमांसा कवी देत नाही. त्यांच्या जीवनात खूपच निराशा पदरी पडली. आंतरजातीय विवाह केल्याने आप्तेष्टांनीही पाठ फिरविली. हा आशय प्रकटपणे कुठे येत नाही. माधव मनोहरांनी त्यांना 'दुःखाचे शाहीर' म्हटले आहे. पण यशवंतांनी दुःखाचा गौरव केलेला नाही वा दुःख- चिंतनातून तत्त्वज्ञानही शोधलेले नाही. (१६) हे मत ग्राह्य वाटते. त्यांच्या कवितांतील दुःख व्यक्तीगत असूनही ते प्रातिनिधीक होते. कवितेच्या आशयाला सार्वत्रिकता प्राप्त करून देण्याचा कवीचा सोस इथे अप्रकटपणे व्यक्त होतो. कारण त्यांची या प्रकारची कविता व्यक्तीगत पातळीवर वाटते. पण इतरांनीही त्यात आपल्याच भावना मांडल्या आहेत असे वाटते व कवितेस सार्वत्रिकता प्राप्त होते. सार्वत्रिकता प्राप्त होण्यासाठी कवीने उपरा प्रयत्न कधी केलेला दिसत नाही. पण तरीही सुशिक्षित मध्यमवर्गीयांच्या आशा आकांक्षा आणि प्रतिकूल परिस्थिती यातील कुचंबनेचे चित्रण करणारी ही प्रातिनिधीक कविता आहे. अत्यंत स्वयंकेंद्रित कविची कविता प्रातिनिधीक स्वरूपाची व्हावी यातच नैराश्याचे कलात्म पातळीवरील अपयश स्पष्ट होते. (१७)

**यशवंतांच्या कवितेतील नैराश्यासोबतच प्रकटलेला आशावाद**

यशवंतांनी निराशेचा सूर ओळखलेला आहे तशी आशावादाची सुक्तेही गाईली आहेत. हा आशावाद निराशेवर मात करणारा निराश होणाऱ्या मनाची समजून घालणारा, सूक्ष्माकडून विशालाकडे नेणारा असा असतो. निराशेने भरलेल्या जीवनास जगण्याची ओढ निर्माण व्हावी हा उद्देश त्या पाठीमागे आहे. मरतो मरतो म्हणून जगणे हे जगणे नव्हे, जगायचेच आहे म्हणून जगणे हे केव्हाही श्रेयस्कर. अत्यंतिक व्यक्तिपरत्त्वेमुळे स्वतःचे दुःख डोंगराएवढे वाटते. पण जगातही आपल्याहून कितीतरी दुःखी माणसे असतात. स्वयंकेंद्रीत माणसाने बाहेरच्या जगाकडे दृष्टी वळवली तर स्वतःच्या दुःखाची निरर्थकता त्याला पटेल. म्हणूनच

''तरशील कठोर गड्या आपल्या विहीरीवरती घडे

पहातो अफाट सागर पुढे''

(हा अफाट सागर पुढे - पाणपोई)

असे मनाला बजावतात. माझ्याच सुखदुःखाचे पवाडे मी कुठवर गाऊ, माझेच जीवनानुभव कुठवर कवितेतून प्रतिपादु, या अफाट अशा जनसमुदायाकडे माझे कधी लक्ष जाणार, पाय पथारीत मी किती काळ लोळावे ? घरातच किती काळ रेंगाळत रहावे? देहाला निकामी ठेऊन कितीकाळ रिकामा घालवू?

हे असे -

'' नको खेळ सैतान - हातात होणे

कृमी - कीटकांचे नको भक्ष होणे

नको संभ्रमी कर्दमी रुद्ध होणे

नको गंजुनी गंजुनी नष्ट होणे''

(दिशांचे सुक्त - ओजस्विनी)

अशी विशालतेची ओढ त्याला लागलेली आहे. तो वास्तवदर्शी असला तरी स्थितीपेक्षा तो गतीप्रिय आहे. वास्तवातले पाश जीवाला बांधून ठेवतात. मुक्त विहार करायला बंदी घालतात. त्यांच्या निराशवादी कवितांत वास्तवाची कटु जाणीव व्यक्त होते. पण इथे कवी म्हणतो-

''वास्तवतेला स्मरणे म्हणजे तीत खितपणे नव्हे

नभात घेणे झेप तियेच्या साखळदंडासवे'' (नव्या किनाऱ्याकडे - ओजस्विनी)

आणि प्राप्त परिस्थिती कितीही कटु अथवा निराशदायी असली तरी या परिस्थितीपुढे शरणागती पत्करू नये.

''शरणागती परिस्थितीपुढे

म्हणजे रहाणे जिवंत मढे''

(परिस्थितीपुढे - कमण्डलू)

परिस्थितीला शरण येऊन स्थितीशील रहाणे बरे नाही. काळाबरोबर पुढे पुढेच गेले पाहिजे. मग वाटेत कितीही अडथळे येवोत. वाटेत माळरान किंवा घाट लागू देत, धूळ फोफाटा उडू देत, ठेचा लागून काटे लागून पाय रक्तबंबाळ होऊ देत. श्वापदांचे किंवा भुरट्या चोरांचेही भय वाटत असणे हे सारे मला माहित आहे तरी

''तरी पुढे पुढेच जाणे सर्व साहोनी''

मला तिथे पुढे कोणी सत्कारार्थ उभे राहिलेले नको आहे. कुणी चिखल, दगड जरी माझ्यावर फेकले तरी मी पुढे पुढेच जाणार.

(जाणे पुढती पुढती - कमण्डलू)

ही पुढे पुढे जाण्याची प्रेरणा नदीपासून मिळते. तीही खडकातून दगड धोंड्यातून वाट काढत पुढे पुढे जात असते. लोक

तिचा नानाविध कारणांसाठी वापर करतात. हे लोकही नानाविध प्रकारचे असतात. पण त्यांच्याकडे तिचे लक्ष नसते. कोणताही ऋतू असो तिच्या वहाण्यात खंड नाही. तिच्यात कोणी काही घाण टाकली तरी ती स्वतःसोबत ती वाहून नेत असते. तिच्याकडे भेदभाव असत नाही. जगाला शोभिवंत करण्याची दीक्षा तिने घेतलेली असते. म्हणून कवीला ही सरीता एखाद्या संतासारखी वाटते. एखाद्या संतासारखे जीवन आचरून ती सारा आसमंत पावन करीत असते. हाच संदेश मानवानेही पाळावा असे कवीला वाटते. म्हणून तर हा आदर्श कवीने लोकांसमोर मांडला आहे.

क्षुद्र गोष्टींची कदर न करता आपले ध्येय आचरणे हा संदेश वरील कवितेतून मिळतो. कितीही संकटे आली तरी आपण तोल ढळू देऊ नये असा बाणाही कवीने स्विकारलेला दिसतो.

''कैक संकटांच्या राशी शिरी कोसळोत
पडी तेवी लोखंडाचा तप्त रसस्रोत
तनूभोवताली जळते नाचू देत पोत
कदर करायची नाही हाच मुळी बाणा''
(बाणा - भावमंथन)

हा बाणा स्विकारल्यावर जीवानात सुख निर्माण व्हायला किती वेळ लागणार? जीवन हे दुःखाने भरलेले आहे हे खरे. पण म्हणून काय सारखेच रडत बसायचे? जीवनात दुःखाप्रमाणे सुखही असते मात्र त्याचा शोध घ्यावा लागतो. न शोधताही सामोरे आले तरी त्याचा आस्वाद घेता आला पाहिजे. सुखाला पाठ फिरवता कामा नये. या सुखाचा घडा त्वरेने भरून घेतला पाहिजे (चल भरोनी घडा घे - ओजस्विनी)

माणसाला गेलेला भूतकाळ आणि येणारा भविष्यकाळ चांगला असे वाटत असते. चालू वर्तमानकाळ हा कुणाच्याच लेखी चांगला आशादायी नसतो. पण भूत आणि भविष्य हे नुसतेच अकर्मक आणि स्वप्नाळू असते. त्यापेक्षा आपल्याला जीवन खरोखरच सुंदर बनवायचे असेल तर वर्तमानातच रमले पाहिजे तोच सुंदर केला पाहिजे तर जीवन सुंदर होईल.

''परडीत माझिया फुले जोवरी जमली
ऐशीच तोवरि वितरत राहीन भवती
कोणतीही नाही मनात अन्य अपेक्षा
हा नटवू रिझवू वर्तमान ह्यापेक्षा''          (पूजा - कमण्डलू)

वास्तवतेच्या कटू जाणीवेने माणसाला हाका घालणारा कवी हाच काय हा प्रश्न इथे पडतो. एकीकडे निराशेचा कडेलोट आणि दुसरीकडे सबळ असा आशावाद ही कवीच्या मनोवृत्तीची परस्पर विरोधी चित्रणे होत. जगाची उफराटी तऱ्हा कवी वर्णितो. त्यामुळे जगाबद्दल माणसाचा दृष्टिकोन निराशवादी बनतो. जगाकडून हालअपेष्टा, निंदा याशिवाय दुसरे काही मिळणार नाही अशी वाचकाची खात्री होते. पण जग आपण म्हणणतो तितके वाईट नाही. असेही अनुभव कवीला येतात आणि कवी लिहीतो,

''नसे जग सर्वस्वी अनुदार

सदा कदा का करिसी तयावर

शापांचा भडीमार

तरी चरफडसी कुटसी का रे

वल्हव नौका धीरे धीरे

तुफान लाटा देतील वाट

तुज़ला व्हावया पार''

(नसे जग सर्वस्वी अनुदार - पाणपोई)

जग अनुदार असले किंवा उदार असले तरी स्वतःची नौका स्वतःच चालविली पाहिजे. त्यासाठी मनाचा उभारा पाहिजे. दुर्दम्य असा आत्मविश्वास पाहिजे. अटोकाट प्रयत्न करायला हवेत.

यशवंतांनी आपल्या आशानिराशावादी कवितांतून परस्परविरोधी मनोवृत्तीचे दर्शन घडविले आहे. एकीकडे वास्तवाचे काठिण्य दाखवले आहे. तर दुसरीकडे या काठिण्यावर मात करणारा दुर्दम्य आत्मविश्वास दाखविला आहे. या आत्मविश्वासाचे दर्शन स्वातंत्र्यवीरांच्या तोंडूनही होते.

''वाढु दे कारागृहांची उंची किती

मन्मना नाही भिती''

(तुरुंगाच्या दारात - पाणपोई)

यशवंतांच्या आशानिराशावादी कवितेचे स्वरूप हे असे आहे. त्यांची निराशवादी कविता हा त्यांचा आत्म्याचा उद्गार

वाटतो तर आशावादी कविता ही संदेशरूप वाटते. त्यात इतरांना दिलेला संदेश आणि इतरांना बलवान बनविण्यासाठी स्वतःच दिलेली शिकवण असे वाटते. अर्थात निराशावादी कवितांचा प्रभाव मनावर असेल तर आणि त्यांच्या निराशवादी कविता समोर ठेऊन आशावादी कविता वाचल्या तर वरील अनुभवाची प्रतीती येते. निराशेने जीवन काळवंडून टाकण्यापेक्षा आशावादाने ते उजळून टाकू या. अशी कवीची भूमिका या पाठीमागे आहे. मात्र हा आशावाद दुसऱ्यांच्या कृपादृष्टीवर अवलंबून असलेला असा दुबळा नाही. समोर येणाऱ्या संकटांशी सामना देणारा, इच्छित ध्येय साधण्यासाठी काट्याकुट्यांचे मार्ग अनुसरणारा धैर्यवान आहे. यातील या आशयामुळेच हा आशावादही हवाहवासा वाटतो. निराशेत खितपत पडण्यातही दुःख आहे पण ते क्षुद्र दुःख आहे. मात्र या क्षुद्र सुखदुःखांची भिती सोडून दुसऱ्या भव्य, उज्ज्वल अशा ध्येयाप्रत जाण्यात पराक्रम आहे यातही दुःख लाभणार आहे. पण ते उदात्त असणार आहे.

**राष्ट्रप्रेम -**

राष्ट्रप्रेम हा प्रथमपासूनच यशवंतांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. ते जन्मले तेव्हाच भारत पारतंत्र्यात होता. देशात स्वातंत्र्यलढ्याचे वारेवहात होते. टिळक हे त्यावेळी लोकाग्रणी होते. त्यांच्या जहाल विचारसरणीकडे लोक आकर्षित होत होते. खेडोपाड्यातून टिळकपंथीय कीर्तनकारांची कीर्तने होत. यशवंत लहान असताना त्यांनी सांगलीच्या पटवर्धनबुवांची अशा प्रकारची कीर्तनं खूप ऐकली होती. त्यांच्याबरोबर अनंतनाथ, दुर्गाप्रसाद, आसाराम तिवारी आणि कवी माधव केशव काटदरे हे त्या काळी ऐतिहासिक कविता लिहीणारे मोठे कवी होते. त्यांचेही ठसे यशवंतांच्यावर पडले. त्यामुळे पुढे पुण्यात आल्यावर त्यांनी लोकसंग्रह मासिकात कविता लिहील्या. त्या स्वातंत्र्य, राष्ट्रीयबाणा, लोकमान्य टिळक वगैरे आशयाच्याच मात्र या आशयामुळे त्यांनी नावाचा आडपडदा घेतला. त्यानंतर त्यांचा महाराष्ट्र शारदामंदिरात व तद्नंतर रविकिरण मंडळात प्रवेश झाला. त्यांच्या कवितेचे स्वरूप काही अंशी बदलले. पण राष्ट्रप्रेमाचा आशय त्यांच्या कवितांतून व्यक्त होतच राहीला.

पारतंत्र्याच्या जाणीवेने सर्व भारतीयांच्या मनात इंग्रजांविरूद्ध तीव्र असंतोष, राग होता. अनेक युवक स्वातंत्र्यलढ्यात जाऊन आपल्या कारवायांनी इंग्रजांना त्रास देण्याचा प्रयत्न करीत. ते पकडले गेले तर त्यांना फाशीची शिक्षा होई. स्वातंत्र्याचे सतीचे वाण घेतलेल्या देशभक्तांची फाशी जाता वेळची मनःस्थिती कवीने 'द्या आम्हाला सुळी' या कवितेतून व्यक्त केली आहे. स्वातंत्र्याच्या लालसेने सर्वच तरुणमने पेटलेली आहेत. तेव्हा फक्त आम्हाला मारून काय करणार? आमचीच भावना हृदयात जागवणारे दुसरेलढवय्ये निर्माण होतील.

''काय हटवुनी हटतो सागर? हटेल एकीकडे

उफाळोन तो दुसरीकडूनि गिळूनी डोंगर कडे''

हा त्यांचा आशावाद आहे. म्हणूनच आम्हाला खुशाल सुळावर चढवा असे क्रांतिकारक म्हणत आहेत. आम्ही शरीराने

फक्त मरू शकतो आत्मा अमर राहील म्हणून

"वाढू देत कारागृहांच्या भिंतींची उंची किती

मन्मना नाही भिती

भिंतींच्या उंचीत आत्मा रहातो का कोंडूनि

मुक्त तो रात्रदिनी"

(तुरुंगाच्या दारात - पाणपोई )

आणि भारतमातेच्या कृपेचा सिंधू माझ्या मस्तकी हेलावत असताना या दुःखाची काय कथा?

आमच्या स्वातंत्र्यलालसेपुढे आम्हाला अग्नीही चंदनासारखा शीतल वाटेल

"हा अफाट सागर पुढे" मधून तरुणांना स्वातंत्र्यलढ्यात उडी घेण्याचेच आवाहन केले आहे हे शेवटच्या दोन कडव्यांतून दिसते.

"ते क्षीतिज रंगले सोनेरी तांबडे

घालील अंगणी कुणी तसे का सडे?

का भरवील हाती मणी कांचनमय चुडे?

ही वादुनि मनिषा दावी मायभू पिळवटूनी आतडे

म्हणून -

हो सज्ज तिची तर आस कराया पुरी"

(हा अफाट सागर पुढे - पाणपोई)

असे आवाहन केले आहे. एवढेही होत नसेल तर कमीत कमी राष्ट्राच्या उद्धारासाठी जे वीराग्रणी धैर्यमेरू रणसंग्रमात उतरले त्यांना तरी आरती गा

"नेटके काही घडेना

काय हेतु जीवना

या विचारी मन्मना

बोधितो की एवढी होवो तरी ते सत्कृती

गा तयांची आरती''

(गाऊ त्यांना आरती - पाणपोई)

कवी स्वतः तर स्वातंत्र्यासाठी पुढे येण्याचा संदेश देत आहे पण नदीलाही तो हेच सांगत आहे. पूर्वीचा शिवरायांच्या वेळचा काळ गेला आणि ते योद्धेही गेले. आता पुन्हा लढण्यासाठी लढवय्ये निर्माण झाले पाहिजेत. त्यासाठी

''-देशभक्तीच्या अनन्यतेचा पिकवी पुन्हा आवेश'' (माण्डवी - यशोधन)

असे कवी सांगत आहे. पूर्वीच्या पराक्रमाचे, ध्येयाचे, बलीदानाचे दर्शन आजच्या पिढीला घडवले तर हा आवेश नक्की निर्माण होईल. म्हणून ''देहाचा पूल'' या कवितेत शिवरायांच्या मावळ्यांनी त्यांच्यासाठी केलेल्या बलीदानाचे दर्शन घडविले आहे. या मावळ्यांचे सर्वांच्यावर इतके प्रेम आणि निष्ठा होती की विस्तवाच्या खंदकावर स्वतःला झोपवून त्यांनी राजांना खंदकाच्या पलीकडे जाण्यासाठी पूल करून दिला. मग स्वातंत्र्यासाठी लोक काय तेव्हाच लढले? आता लढत नाहीत की लढण्याची गरज नाही.

ते बलीदान करण्याची मनिषा आज दिसत नाही. ती स्वातंत्र्याची गंगा आज अटून गेली आहे म्हणून हा इतिहास आपण श्रवण करताना जरी चित्ताला खिन्नता झाली तर विचार करावा की -

''का स्वराज्य तेव्हा झाले          का स्वराज्य सांप्रत नुरले''

पण हे सगळे करण्याची गरज काय तेही कवी सांगतो. या इंग्रजीसत्तेचे निशाण जेथे फडकले आहे तिथे शेतकरी सगळा मजूर झाला आहे. तो कष्ट करून सोने पिकवतो पण सारा भरावा लागतो. म्हणून अन्नाला मोताद होतो. कर्जात हैराण होतो, अर्ध्यापोटी झोपी जातो. जेथे बाल्य खुरटले आहे, तारुण्यातूनही वारे गेले आहे हे जेथे नैराश्याला उधाण आले आहे तेथे हे इंग्रजी सत्ते, तुझे निशाण फडकते आहे.

''स्थितीत दुःसह ल्याच भयंकर

कुजत पडावी प्रजा निरंतर

हुं की चू करताच तिच्यावर

झाणिलिये उपसले जाई कृपाण

फडकते तुझे तिथेच निशाण ''          (फडकते तुझे तिथेच निशाण- पाणपोई)

या प्रवृत्तीमुळेच अश्रूंच्या आणि रक्तांच्या नद्या वाहत आहेत, जनतेवर अन्याय होतो आहे. जिथे सुखाची सिंधू उफाळतो आहे, तिथे हीनेकमा विषाचा बिंदू टाकून देतील. पण आम्ही तुम्हाला पुरून उरू.

''रचा हो धूर्त दुष्टांनो, कसाही व्यूह जन्जाल

तया उल्लंघूनी जाया आम्हाला पंख पहाल

कसाही चालवा मारा न दावू अल्पही ढाल

न भंगे वज्रसंपाते शिरी जी आमुच्या ढाल

(खलांनो - यशोधन)

तुम्ही आमच्यावर कितीही अन्याय केलेत तरी आम्ही तुम्हाला पुरून उरू. तुमचे घाव झेलण्यासाठीच आम्ही ठाण मांडले आहे.

युद्धातल्या सैनिकासही कवी धैर्य आणि राष्ट्राबद्दलचे प्रेम कायम ठेऊन लढ असे सांगत आहे. सैनिकाला मरण्यावाचून गत्यंतर नाही. पण अंथरूणावर मरण्यापेक्षा रणमैदानावर मरण आलेले चांगले. तू स्वतःला क्षुद्र समजू नकोस. ''तुझे बलीदान निर्मिल योद्धे पानोपान''. (सैनिकास - यशोगंध)

पण रक्त सांडल्यविनाही स्वातंत्र्य मिळवता येईल आणि ते सर्वांच्या हिताचे होईल. इथे कवी देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राण देण्यास तयार आहे. पण रक्त दाखवून नाहीतर उपोषण करून आणि उद्याच्या जगाचे चित्रही तो रेखाटतो.

''शस्त्रास्त्रांचे नुरे प्रयोजन मनुजाच्या जगतात

स्नेह बंधने नसो गोवली वर्चस्वाची तात'

(''अखंड अर्घ्यप्रवान - पाणपोई)

गांधीजींचे अहिंसेचे तत्त्वज्ञान यात प्रतिपादले आहे. सर्व जगाला हे तत्त्वज्ञान तारू शकते. म्हणूनस्वातंत्र्यसूर्यास कवी -

''म्हणूनि रक्त सांडल्या विना घे हा रक्ताचा अर्घ्य

अखेर ह्याने तारि फोफावो माझे जिवीत कार्य ''

ही कविता म्हणजे गांधीजींचे आत्मनिवेदनच वाटते.

राष्ट्र परकीयांच्या ताब्यात असताना त्यांची परकीयांच्या दास्यातून सुटका करण्यासाठी राष्ट्रनिष्ठा असावी लागते. पण ज्या भूमीत आपण वाढलो, खेळलो, पोसलो त्या जन्मभूमिशी सदैव हृदयाचे नाते असावे, निष्ठा असावी म्हणून यशवंतांनी महाराष्ट्रे गीते लिहीली आहेत.

सगळ्या भारताचा नकाशा पहाताना महाराष्ट्र आधी डोळ्यांत भरतो. हीच माझी मायभूमी असे बोल तोंडातून येतात. पण त्याच्या वैभवाच्या उत्कर्षासाठी मी काय केले ? ही आत्मनिष्क्रीयतेची भावना निर्माण होऊन मी पस्तावतो.

''अमर्याद भूगोल विस्तारलेला किती त्यामधी देश पुंजाळले

महाराष्ट्र भूमीचे परी त्यात माझ्या दिसे संप्रती ते तेज मन्दावले

तयांसारिखा दिव्य तेजोगुणी हा महाराष्ट्र होईल केव्हा पुन्हा ?

महाराष्ट्र माते ! जना बुद्धी दे. या तुझ्या वैभवोत्कर्षसंवर्धना।'' ( माझ्या महाराष्ट्रा -यशोधन)

आता स्वतःच्या मायभूमीच्या उत्कर्षासाठी प्रयत्नशील राहीले पाहिजे. यासाठी मी मराठी आहे, हा महाराष्ट्र माझा आहे असा दृढभाव हृदयात पाहिजे.

''मी हा मराठी महाराष्ट्र - धर्मो''

''असो हाच ताईत गंडा गळा''

यज्ञोपवीताचिया धारणाचा

घडो ह्या न मंत्रावीन सोहळा'' (मंत्राक्षता - कमण्डलू)

जे संभ्रमी, कर्दनी, संकटी असतील त्यांना हा घोष ऐकू येताच त्यांच्या अंगी नवीन धैर्याचा संचार व्हावा. आम्ही दुसऱ्याला स्फुर्तीदाते झाले पाहिजे. तसेच दैत्यांना दरारा निर्माण करणारे असले पाहिजे. महाराष्ट्र हे आदर्श राष्ट्र व्हावे इथे कुणी कुणाचा धनी वा चाकर नसावा. एकाचा नफा, दुसऱ्याचा तोटा नसावा. इथे रहाणारे दुःखी नसावेत, कर्तव्यतत्पर असावेत. जर तुम्हाला -

''राज्यमंडळात असो दीप्त माळ

ऐशा स्वर्गात महाराष्ट्र असो सर्वकाळ''

असे वाटत असेल तर त्यासाठी

''ह्यास्तव हो उंच चढा अधिकाधिक उंच चढा.

पडता झडताही उठा गगनमंडळास भिडा''      (उंच चढा ! उंच चढा ! - कमण्डलू)

नव्या महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी गतकाळावर गुजराण करणे सोडून दिले पाहिजे. त्यासाठी नवीन संकल्प केले पाहिजेत. जी जी रुढींची पुरातन भूते मानगुटीवर बसली आहेत त्यांना गाडून टाकून मूठमाती दिली पाहिजे. भट्टीतून जसे सोने काढावे तसा महाराष्ट्राचा नवीन जन्म व्हावा.

पण नुसते बोलणे नको.

'' कृतीने संपादू कर्तृत्त्व परीस

बुद्धिचा परिस स्फुर्तीचा परीस

लावू महाराष्ट्री कडेकपारीस''      (नवा महाराष्ट्र - कमण्डलू)

महाराष्ट्राची स्थापना १९६० साली झाली त्यावेळी कवीने व्यक्त केलेले हे मनोगत आहे. ही स्थापना झाल्यानंतरच्या पहिल्या दिवाळीला इडापिडा टळो म्हणून कवी 'सयांनो, लावू पणत्या' (कमण्डलू) म्हणतो आहे.

मेरूमान्दार खुजे होतील असे महाराष्ट्राचे पुत्र काल आज निर्माण झाले. तेव्हा आपल्या लेखणीने -

''अल्पसेवा तरी होऊ दे हातुनि

याचितो हे महाराष्ट्र भू ! वन्दनि '' (महाराष्ट्र गीत - भावमंथन)

ही त्यांची महाराष्ट्र गीताच्या मागची प्रेरणा आहे.

**यशवंतांच्या कवितेतील समग्र विशेष-**

१. यशवंतांची कविता जशी सौंदर्यवादी व आत्मनिष्ठ आहे तशीच ती सामाजिक जाणीवांचा वेध घेणारीही आहे. सामाजिक जाणीवांचा वेध घेताना समाजातील दुष्प्रवृत्तीवर ती कडाडून हल्ले चढविते. समाजातील विसंगतीचे औपरोधिक चित्रण त्यांच्या कवितेत येते.

२. त्यांची कविता वास्तवदर्शी आहे. सुरवातीच्या काळात लिहीलेल्या प्रेमकवितांत ते कल्पनारम्यतेत ते गुंग झालेले दिसतात. पण तरीही वास्तवाची जाणीव त्यांनी सोडलेली दिसत नाही.

३. स्त्रीसौंदर्याचे शरीरनिष्ठ वर्णन त्यांच्या कवितेत नाही. शरीरापेक्षा मनाचे सौंदर्य त्यांना अधिक भावते.

४. त्यांची सर्वप्रकारची कविता प्रकट होताना बहुदा आपली गेयतानुरूप चाल घेऊनच बाहेर पडते. त्यांची सर्वच कविता गाण्यास अनुकूल ठरावी अशी आहे. त्यामुळे त्यात श्रुतीसुभगताही आहे.

५. ही श्रुतीसुभगता येण्यासाठी यमकांचा भरपूर वापर त्यांनी केला आहे. त्यांच्याइतकी यमकांची खैरात आधुनिक मराठी कवींत दुसऱ्या कोणी केली नसेल असे वि. द. घाटे म्हणतात. पण कधीकधी यमक जुळण्यासाठी कुठे शब्दांची तडजोड केल्याचे जाणवते पण अशी स्थळे पार विरळा.

६. त्यांच्या कवितेचा आणखी विशेष म्हणजे प्रासादिकता. त्यांची कविता सर्वसामान्य रसिकालाही कळते. आणि ती रसिकांसाठी आहे याची जाणीव ठेऊन लिहील्यासारखी वाटते. कवीता वाचताना वाचकाला काही संकल्पना समजणार नाहीत म्हणून त्यांचे स्पष्टीकरण कवीतासंग्रहाच्या शेवटी कवीतेच्या नामोल्लेखासह समजून देण्याचा प्रयत्न केला आहे.

७. यशवंतांची सगळी कविता वृत्तबद्ध आहे. विविध छंद, जाती, वृत्ते यांचा वापर त्यांनी कवितेत केला आहे. कुठे रागाचाही उल्लेख येतो तर कुठे गाण्याची चाल दिली आहे. मुक्तछंदात्मक रचना त्यांनी फार थोडी केली आहे आणि तीही उत्तर कालखंडात.

८. यशवंतांवर चिरनैराश्येचा आरोप केला जातो. पण यशवंत वीरत्त्वाला आव्हान करणाऱ्या आणि दुर्दम्य आशावादाने रसरसलेल्या कविताही लिहीताना दिसतात. संकुचिततेकडून विशालतेकडे जाण्याचे वेड त्यांच्या मनाला आहे. मात्र नैराश्येचा आरोप व्हावा अशा तीव्र निराशेचा सूर आळवणाऱ्या कविताही त्यांनी लिहील्या आहेत.

९. त्यांच्या निराशवादी कवितेतील आशय हा व्यक्तिगत् पातळीवरचा असला तरी प्रातिनिधीक स्वरूपात प्रकट झालेला दिसतो.

१०. कौटुंबिक जीवनातील प्रेमजिव्हाळा, वात्सल्याचे चित्रण विशेष जिव्हाळ्याने त्यांनी कौटुंबिक कवितेतून त्यांनी केलेले आहे. माता-पुत्र, पिता - पुत्र यांच्यातील प्रेमाचे धागे ही कविता व्यक्त करते. अन्य नात्यांचा यात समावेश नाही. ही उणीव वाटते.

११. पण या कवितांमध्ये जे वात्सल्याचे चित्रण दिसते त्यामुळे वाचकाचा उर भरून येतो. माता-पुत्रातील प्रेम विशेष जिव्हाळ्याने व्यक्त केले आहे. 'आई' ही कविता तर कितीही पाषाणहृदयी माणसाचे हृदय द्रवायला लावेल अशीच आहे. याचे कारण कवीतेतील उत्कट भावना हेच होय.

१२. आई-वडीलांचे मोठेपण या कवितांद्वारे प्रतिपादन केले आहे.

१३. तीव्र निराशेचा सूर आळवणाऱ्या कवितांत कवी जगाबद्दल निरासक्त होऊन मरणाची वाट पहातो आहे. मृत्यूच आपली

यातून सुटका करू शकेल असे वाटते. तर प्रेमकवितांतून आपल्या दुःखमय जीवनात प्रेयसीचा प्रवेश झाला म्हणजे आपले क्लेष, चिंता दूर होतील हा आशय व्यक्त झाला आहे. त्याचबरोबर मनातले नैराश्य घालविण्यासाठी मनापुढे आशादायी चित्रेही उभी केली आहेत व दुःखाशी झगडण्यासाठी झुंजारपणा यावा असा ध्येयवादही स्वतःपुढे उभा केला आहे. चिरनैराश्याची गाणी आळवली आहेत. पण त्यावरील उपायही सांगितले आहेत.

१४. भारत पारतंत्र्यात असताना परकीयांशी लढा देण्यासाठी देशातील तरुणांच्या वीरत्त्वाला आवाहन करणे आवश्यकहोते. इतिहासातील पराक्रमाचे व बलिदानाचे चित्र म्हणूनच आपल्या ऐतिहासिक कवितांमधून युवकांसमोर उभे केले आहे.तसेच इंग्रजी सत्तेचा जुलमीपणा व्यक्त केला. देशासाठी फाशी जाणाऱ्या देशभक्तांचे मनोगत व्यक्त केले.

१५. स्वातंत्र्य मिळाल्यावरही आपल्या देशाचा, राष्ट्राचा विकास साधण्यासाठी आपल्या मातृभूमीवर प्रेम असावे लागतेच. हा आशयही त्यांनी आपल्या महाराष्ट्र गीतातही व्यक्त केला आहे. यशवंतांची कवीताही विपुल तशीच विविध आणि विविध वैशिष्ट्यांनी युक्त आहे. त्या त्या प्रकारच्या कवितांचा रसास्वाद घेताना त्यांच्या दृग्गोचर होणाऱ्या वैशिष्ट्यांचा उल्लेख केला आहेच. त्यामुळेच पुनरावृत्तीचा दोष निर्माण होऊ नये म्हणून ठराविकच वैशिष्ट्यांचा मागोवा घेतला आहे पण त्यांची विविध स्वरूपाची कविता स्वतःचे असे वेगळे वैशिष्ट्य निर्माण करणारी आहेत. उदा. प्रेम कविता

प्रेमाला शारीरिकतेपासून दूर नेणारी मनाला महत्त्व देणारी, जानपद कविता, कृषीसंस्कृतीला साहित्यात अधिष्ठान मिळवून देणारी, उत्कट राष्ट्रप्रेम व्यक्त करणारी असे स्वतःचे असे वैशिष्ट्य असणारी आहे. त्यातील आशय आक्रमक, अतिशोयोक्त भाषेत नसला तरी स्वतःचे स्वाभाविकपण घेऊन येतो.

## संदर्भ टीपा

| | | |
|---|---|---|
| १. पाणपोई | : | यशवंत कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे - ३०<br>सातवी आवृत्ती १९७९ प्रस्तावना - वि. स. खांडेकर. पृष्ठ २८ |
| २. महाराष्ट्र जीवन | : | संपादक गं. बा. सरदार लेख - 'वाङ्मय - आधुनिक काल' -<br>रा. रा. वाळींबे पृ. ३३५ |
| ३. 'त्रिज्या' | : | नागनाथ कोतापल्ले, प्रोग्रेसिव्ह को-ऑप. पब्लिकेशन्स सोसायटी<br>जि. औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९७८ पृ. ३ |
| ४. छत्रपती शिवराय | : | यशवंत कॉन्टिनेण्टल प्रकाशन पुणे -३०, प्रथमावृत्ती १९६८,<br>प्रस्तावना |
| ५. काव्यचिकित्सा | : | माधवराव पटवर्धन, व्हीनस प्रकाशन, प्रथमावृत्ती १९६४, पृष्ठ ३ |
| ६. 'यशोगंध' | : | यशवंत, प्रकाशन, य. दि. पेंढारकर पुणे -२<br>जानेवारी १९३५, पहिली आवृत्ती, प्रस्तावना म. गो. रानडे पृ. २ |
| ७. उनि. | : | 'काव्य चिकित्सा' पृ. ४ |
| ८. 'आधुनिक मराठी ग्रामीण कविता - एक अभ्यास' | : | हेमलता गायकवाड, फडके प्रकाशन, कोल्हापूर प्रथमवृत्ती १९९७,<br>पृ. ७३ |
| ९. 'आधुनिक कवी भाग - दुसरा' | : | दामोदर नरहर शिखरे दी टिचर्स आयडीयल पब्लिकेशन हाऊस<br>लि. पुणे -२ प्रथमावृत्ती १९५३, पृ. ८४ |
| १०. उनि | : | 'पाणपोई' प्रस्तावना पृ. २८ |
| ११. 'साहित्यिक गप्पा - दहा साहित्यिकांशी' | : | जयवंत दळवी सन पब्लिकेशन १९८५ - यशवंतांची मुलाखत<br>पृ. १६२ |
| १२. 'यशोधन' | : | यशवंत चित्रशाळा प्रकाशन पुणे - २<br>पाचवी आवृत्ती १९५६, प्रस्तावना म. गो. रानडे पृ. ७ |

१३. 'मराठी कवितेतील आई' : प्रा. ग. हं. गायकवाड.

एस. के. प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती डिसेंबर १९९४, पृ. ४६

१४. तत्रैव. : पृ. ६

१५. 'प्रदक्षिणा' : संपादक रा. श्री. जोग, कॉन्टिनेण्टल प्रकाशन पुणे, पाचवी आवृत्ती

१९७२, पृ. २५

१६. 'मराठी कविता स्वरूप आणि विवेचन' : निशिकांत ठकार. स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन पुणे

प्रथमावृत्ती नोव्हेंबर १०७७, पृ. २९१

१७. तत्रैव. : पृ. २९१